# गीत मंजूषा

य. रा. कळवणकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९३४
२१ १९८३




REFBK-0018852
REFBK-0018852

२१३४ काव्य
संग्रह
८१३६८
25/12/68

८७३६८ काव्य
२१३४ २५/२/७४

# गीतमंजूषा

य. रा. कळवणकर

दा. क्र. १८८५२

प्रकाशक :
य. रा. कळवणकर
४७१ शनिवार पेठ,
दक्षिणमुखी मारुती जवळ,
पुणे ३०

•

© सर्व हक्क प्रकाशकास्वाधीन

•

किंमत :
दहा रुपये

•

मुद्रक :
अ. वि. जोशी
साहित्य मुद्रणालय,
१२६३, सदाशिव पेठ,
पुणे ३०

कैलासवासी

तीर्थरूप

**आई व भाऊ**

यांचे स्मृतिसमाधीवर

REFBK-0018852

REFBK-0018852

# प्रास्ताविक निवेदन

'**गीतमंजूषा**' हा माझा संपूर्ण कवितांचा संग्रह मी प्रसिद्ध करीत आहे. यांत पूर्वी 'सुनीत-माला' या नावानें प्रसिद्ध केलेल्या सुनीतांचा व वेळोवेळी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कवितांचा समावेश केला आहे. तसेच शेवटी काही इंग्रजी कविता व काव्यात्मक इंग्रजी गद्य प्रबंधहि यांत समाविष्ट केले आहेत. हा सर्व मराठी व इंग्रजी काव्य-संग्रह मी रसिकांस सादर करीत आहे. रसिकांस हा आदरणीय वाटेल अशी आशा आहे.

ह्या काव्यसंग्रहास 'महाराष्ट्र कवि' श्री. यशवंत यांनी प्रस्तावनारूप आपले बहुमोल 'चार शब्द' लिहून देऊन त्याला जी विशेष शोभा प्राप्त करून दिली त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. वास्तविक कवि यशवंतांचा व माझा मुळीच परिचय नव्हता. त्यांची केवळ तोंड ओळखच मला होती. अशा परिस्थितीत प्रकृति अस्वस्थ असतानाहि त्यांनी उदार बुद्धीने या संग्रहास प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल त्यांचे मानावे तितके आभार थोडेच होतील. ह्या कामी नू. म. वि. प्रशालेतील शिक्षक व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. न. म. जोशी यांनी आपुलकीने जी मला मदत केली त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या मदती-शिवाय कवि यशवंतांची भेट होऊन त्यांचे 'चार शब्द' या संग्रहास लाभणे बहुधा अशक्य झाले असते.

श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कवि 'कुसुमाग्रज' यांनी या काव्य-संग्रहा-बद्दल आपला अभिप्राय दिला आहे. वस्तुतः कवि कुसुमाग्रज यांची तोंड ओळखहि मला नाही असे असून केवळ पत्राद्वारे मी त्यांना विनंती केली, तिला मान देऊन त्यांनी आपला योग्य अभिप्राय लिहून पाठविला. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक मी आभार मानतो. त्यांचा अभिप्राय मिळवून देण्याचे कामी माझे मित्र श्री. ल. पां. सोमण (नाशिक) यांचे मला फार साहाय्य मिळाले. त्यांचाहि मी ऋणी आहे.

मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयातील इंग्रजी-भाषा विभागाचे प्रमुख, प्राध्यापक श्री. भा. गो. जोशी, यांनी ह्या काव्य-संग्रहातील इंग्रजी विभागास उत्कृष्ट इंग्रजीत रसग्रहणरूप सुंदर अभिप्राय लिहून देऊन मला उपकृत केले आहे. हा अतिशय सुरस व यथोचित इंग्रजी अभिप्राय लिहून दिल्याबद्दल त्यांचे मी अत्यंत मनःपूर्वक आभार मानतो.

साहित्य मुद्रणालयाचे श्री. वि. अ. जोशी व श्री. अनंत वि. जोशी यांनी छपाईचे काम सुबक रितीने केले. चित्रकार जोशी यांनी सरस्वतीचे तिरंगी चित्र काढून दिले व ब्लॉक मेकर व्ही. जोशी यांनी ब्लॉक्स त्वरित करून दिले याबद्दल या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

पुणे
दिनांक ३०-११-१९७३

य. रा. काळवणकर

# चार शब्द

श्री. कळवणकरांनी आपली "गीतमंजूषा" माझ्यापुढे आणून ठेवली. मी आशीर्वादपर चार शब्द लिहावे अशी त्यांची अपेक्षा दिसली. आशीर्वाद देण्याइतकी वडीलकी माझ्याकडे येते की नाही, याची मला शंका आहे; त्याचप्रमाणे मंजूषेत काय काय साठवले आहे ते मी सांगायला पाहिजे काय? रत्नप्रभा डोळसाला दिसून येईल आणि सुगंध अंधालाहि जाणवेल. मध्यस्थाची आवश्यकता वाटावी इतकी जादुगिरी किंवा कूटमयता इथें नाही.

प्रस्तुत संग्रहांतील काही कविता पूर्वी नियतकालिकांच्या नौकांत बसून मिरवल्या आहेत. बहुतेक सुनीतांची तर माला गुंफून श्री. कळवणकरांनी रसिकांना अर्पण केली होती. तथापि त्या त्या वेळचे प्रकाशन, बराच काळ लोटल्यामुळे, वाचकांच्या स्मरणांतून गेले असण्याचा संभव आहे. यासाठी विखुरलेल्या वस्तूंचे संकलन आराशीच्या स्वरूपात करण्याने प्रदर्शनीय ठरते. ह्या भावनेतून ही 'गीतमंजूषा' सिद्ध झालेली असावी.

विसाव्या शतकाच्या तृतीय चरणात हा कवितासंग्रह प्रकाशित होत आहे हे ध्यानी घेतले म्हणजे चटकन जाणवते ते हे की मराठी कवितेने सद्यःकाली जो पेहराव अंगिकारला आहे तो ह्या कवितेला माहीत नाही. ही कविता रविकिरण मंडळाच्या जमान्यात अंकुरली, पोसली आणि बहरली आहे. कवीचा पिंड त्या काळाशी संबद्ध असल्यामुळे अलीकडचे थेर तिला अवगत नाहीत. वृत्त, जाति, छंद वगैरे वेषभूषा रविकिरण मंडळाच्या वळणाची आहे. प्रामुख्याने दिसून येते 'सुनीत' काव्यप्रकाराचे विलसित. श्री. कळवणकर यांच्या प्रकृतीला तो काव्यप्रकार छान मानवला आहे.

जी गोष्ट बाह्य परिवेषाची तीच गोष्ट अंतरंगाची. आज प्रतिकांचा हव्यास फार वाढलेला दिसतो. प्रतीक हे बव्हर्थसूचक असावें, आशयाला सामावणारे काच पात्र असावे. पण सद्यःकालीन कवितेत प्रतीके ही सीलबंद पेट्यासारखी वाटतात. युद्धकाळात दिव्यांचा प्रकाश बाहेर दिसू नये म्हणून झडपांची सक्ती असते. त्या झडपा म्हणजे जणु काही गोषाच! गोषाच्या आड काय सौंदर्य लोपले आहे ते तिळमात्र कळू नये. तसा प्रकार जर प्रतीकांच्या अंगिकाराने होत असेल तर तो हानीकारक नव्हे काय? गूढ प्रतीके आणि दुर्बोध भाषा यांचा संयोग झाला की ती कविता रसिकापासून दूर गेलीच म्हणून समजावे.

श्री. कळवणकरांच्या अभिव्यक्तीत अर्थसुगमता आणि प्रसाद प्रत्ययास येतो. त्यांचा व्यवसाय शिक्षकाचा होता. तेव्हां अर्थसुगमतेकडे त्यांची प्रवृत्ती असावी हे

स्वाभाविक आहे. जे स्वतःला जाणवले ते दुसऱ्यालाहि जाणवावे, ही अभिव्यक्ती मागची प्रेरणा असते. त्या दृष्टीनें कोणतीही कविता नजरेखालून घालावी; वाचकाचा हिरमोड होणार नाही.

ह्या कवितेला काही राजकीय वा सामाजिक पंथीय झापडी नाहीत. इंग्रजी कवितांचे अनुवादहिं ह्या गीतमंजूषेत आढळतात. 'कझाबिआंका', 'द् रेन्बो', 'द् बेगर् मेड्', 'होम् दे ब्रॉट् हर् वॉरिअर् डेड्' ह्या कविता अनुवादासाठी त्यांच्या हाताला लागल्या त्या त्यांच्या व्यवसायामुळेच. काव्य-प्रेमाने, क्रमिक पुस्तकापलीकडील इंग्रजी कविता त्यांच्या हाती आल्या नाहीत. पण अनुवादित कवितांत इंग्रजी प्रमाणे संस्कृत स्तोत्रादिकांकडे त्यांची नजर गेलेली दिसते. हे अनुवाद वाचतांना त्यांच्या भाषा प्रभुत्वाची साक्ष मिळते. अनुवाद करताना हटाकृष्टपणा येण्याची भीति असते; पण तसे इथे झाले नाही. भाषेचा सफाईदारपणा हा गुण ह्या अनुवादांतहि प्रत्ययास येतो. एकंदरीतच भाषालाघव मोहक आहे. 'भंगलेले देऊळ,' 'मोहावृत,' 'सांजतारा,' अशा सारख्या हृद्य कवितांचे उल्लेख इथे करून प्रपंच विस्तार करण्याची जरूरी नाही. पण इतके निश्चित म्हणतां येईल की बहुतेक सुनीते कवीचा जीवनविषयक दृष्टिकोन आणि चिंतनशीलता व्यक्त करतात.

प्रस्तुत कविता संग्रह प्रसिद्ध करण्यांत श्री. कळवणकरांचा हेतु काय असावा असा प्रश्न मनांत उगाच डोकावून गेला. ह्या प्रास्ताविकाच्या प्रारंभी एक कारण सूचित केले गेलेहि आहे. कविता प्रसिद्धीने चार पैसे कनवटीला जमतील, अशी अपेक्षा भल्या-भल्यांना सुद्धा बाळगता आली नसेल. मग आपणासारख्याने ती बाळगावी कशी, हे ते जाणत असतीलच. आणि म्हणूनच ते म्हणत आहेत.

खुडली फुले बघ शारदे, हृदयांतल्या वनिकेतली
वनमाळ ही चरणांवरी तव वाहण्या नव गुंफिली
मधुगंध ये हिजला न वा मज हे मुळीं समजेचिना
उपहार उज्ज्वल प्रीतिचा, करणार का अवहेलना ?

रसिक काय म्हणतील ते म्हणोत, पण आपल्या आराध्यदेवतेकडून अवहेलना होऊ नये ही त्यांची भावना आहे. ह्या भावनेने---

मराठी सारस्वताच्या महानदीत कवि हा आपला अर्घ्य अर्पण करीत आहे असे मला वाटते. अर्घ्यप्रदानाने नदीच्या जलौघात भर पडत नाही. पण श्रद्धाशीलाला तेणे करून समर्पणातले समाधान लाभत असते. हयातभर जमविलेली पुंजी पुढीलांच्या हाती निरवताना त्या पुढीलांच्या ऐश्वर्यात विशेष भर पडण्याइतकी ती पुंजी नसली तरी ती उद्योगशीलतेची द्योतक असते. उदरभरणासाठी काही ना

काही व्यवसाय करावा लागतो. यांचा व्यवसाय तर अध्यापनाचा होता. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर काही संस्कार घडवता आले, हे गोड समाधान त्यांना लाभले असेलच. फावल्या वेळात कवितारचनेत त्यांनी मन रमविले हा छंदहि संस्कार घडविणाऱ्या अध्यापन-व्यवसायाला पूरक ठरला आहे. छंद म्हणजे अपव्यय नसावा, छंद वांझोटा नसावा. वेळेचा विनियोग अशा निरामय आनंद देणाऱ्या छंदांत करता येणे सर्वांनाच सुचत नाही, सर्वांनाच साधत नाही. ते मी साधले आहे, असे ते मनात म्हणत असतील. 'गीतमंजूषे'चे हे श्रेय खासच लक्षणीय आहे. आपण अनुभवलेल्या आनंदांत ( आपण अलिप्त वा आडबाजूला राहूनहि ) इतरांचा समावेश होऊ शकतो, तो असल्या उपासनेने. इथे अर्थातच काहीही अमंगल नाही, काहीही क्षुद्र नाही. नवीनतेचा ऊर्फ अचावतपणाचा साज नसला तरी, अभिरुचीची कदर बाळगणारा रसिक म्हणेल की आहे ते प्रसन्न आहे, उद्‌बोधकहि आहे.

पुणे-३०
१८-१०-१९७३

यशवन्त दिनकर पेंढरकर

# कवि कुसुमाग्रज यांचा अभिप्राय

श्री. य. रा. कळवणकर, यांस, —

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपला ‘ गीतमंजूषा ’ हा काव्य-संग्रह मी वाचला. आपल्या कवितेचे एकूण रूप आल्हादकारक आहे. कविता स्वतःच्या समाधानासाठी लिहिली असली तरी रसिकतेने तिचा आस्वाद घेणारा वाचक मिळाल्यानेच या समाधानाला पूर्णता येते. असे समानधर्मी वाचक मिळावे इतकी आपली कविता गुणशालिनी नक्कीच आहे. कविता वाचीत असता विशेषत्वाने मला जाणवले ते हे की वृत्त, छंद, शब्द, इत्यादि अंगांत ही अभिजात परंपरेचा वारसा मिळणारी व निर्दोष आहे. आज दुर्मिळ झालेले आपल्या कवितेचे हे घाटदार रूप मला फार मोहक वाटले. शार्दूल-विक्रीडित, मंदारमाला, इत्यादि संस्कृत वृत्ते राहोच, पण रविकिरण मंडळाच्या वा तांब्यांच्या काळांतील जाति-वृत्ते आणि छंदहि सध्याच्या कवितेला अनोळखी झाले आहेत. जेव्हां गेयतेसाठी म्हणून त्यांचा वापर होतो, तेव्हां बहुधा तो सदोष आणि रसविघातकच असतो. अशा परिस्थितीत आपल्या काव्याचा हा विशेष गुण जुन्या कवितेशी परिचय असलेल्या रसिकांना आकर्षक वाटेल यांत मला शंका वाटत नाही. बाह्य रूपात आपली कविता जशी जुन्या वळणाची आहे, तशी अंतरंगांतहि बालकवि, गडकरी, तांबे, यशवंत, इत्यादि कवींच्या परंपरेत तिचे संगोपन झाले आहे हे उघडच आहे. संध्या, रजनी, वसंतवायु, संक्रांत, लक्ष्मीपूजन, दसरा, चांगुणा, चिलया, कोकिळा, इत्यादि परिचित विषय येथे आढळतात. सर्वसाधारण रसिक मनाला जागवणारा आणि आवडणारा परिचित आशयच ही कविता नेटक्या शब्दांत, सुबोध शैलीत प्रगट करते. बालकवि, तांबे, यशवंत, यांनी जी शिखरे आक्रमित केली, त्या प्रांताचे एक मनोज्ञ दर्शन ती नक्कीच घडविते. पांचवारी पातळाच्या आणि सलवार-कुडत्याच्या या जमान्यात ही नऊवारी वस्त्र ल्यालेली, सरी-पाटल्यांनी अलंकृत असलेली, खाली पाहून चालणारी, आपली कविता-कन्या, तिच्या वेगळेपणामुळे अनेक रसिकांना आनंददायक वाटेल असे मला वाटते.

आपला

**वि. वा. शिरवाडकर**

नाशिक
दिनांक १०-९-१९७३

# An Appreciation

Here is delectable fare for the discerning reader, presented by one of our eminent teachers who had the good fortune to guide young pupils for over forty years. A man nurtured in humble surroundings and influenced by his long association with children, he is sensitive to the beauty of the world around and, what is more, he has endeavoured to communicate his experience to us in words whose rhythm has a haunting quality. Some of his poems–*To the Rising Sun* and *To the Evening Star* are reminiscent of wordsworth's yearning for eternal peace and illumination, while his prose passages have distinct echoes of Tagore's *Gitanjali* and, occasionally, the pleasing aroma of the devotional verse of our saints. His tributes to our heroes in the struggle for emancipation show genuine patriotism and are enshrined in words of simple dignity. One is struck by his admirable workmanship, especially in his well-knit sonnets, and in the choice of his homely diction in both prose and verse. One only wishes we had glimpses of his personality in another entertaining anthology.

**B. G. Joshi**
Head, Department of English,
D. G. Ruparel College,
Bombay–16.

December 1, 1973

## अ नु क्र म णि का


| | |
|---|---|
| श्रीशारदावंदन | १ |
| शारदेच्या चरणीं | २ |
| स्वात्मार्पण | ३ |
| नर्तन | ४ |
| सांजतारा | ५ |
| आत्मस्तोत्र | ६ |
| संभ्रम | ७ |
| रोखीं तोफ तुझी अमोघ ! | ९ |
| सोन्याचा पाऊस | १० |
| कविता-कन्येस | १२ |
| कलांची राणी | १३ |
| अभिसारिका | १५ |
| पाहूं कुठें अतां तें ! | १६ |
| महात्माजीस | १७ |
| कांजवे | १८ |
| प्रेमाकुल संध्या-तारकेस ! | २१ |
| इंद्रचाप | २१ |
| ओवाळणी ही धर ! | २२ |
| भंगलेले देऊळ | २३ |
| आहेस तूं जगीं या ! | २५ |
| संध्यातारकेचें दर्शन | २६ |
| कवि बाळा रे ! | २८ |
| कोकिळेस | २९ |
| सख्या कोकिळा, ये ये ये ! | ३० |
| प्रभात | ३२ |
| श्वान-क्रंदित | ३३ |
| दोन करुणाश्रु | ३३ |
| सीमोल्लंघन | ३५ |
| भिकारीण युवती | ३६ |
| विफल जीवन | ३७ |
| घेईं प्रभो जन्म ! | ३८ |
| माझी प्रियतमा | ४० |
| रजनीस आवाहन | ४१ |

हा जादूगार कोण ? ४३
गुलाबिनीचें फूल ४४
अन्धत्वयाचना ४५
हासतसे संध्याराणी ४५
फुलपांखरास ४७
एकनिष्ठ कुमार ४९
गुळ्या ! ५१
धावा ५२
अनुताप ५३
श्रीकृष्ण स्तवन ५४
प्रशांत रजनी ५६
व्याकुलता ५७
श्रीमद्‌भगवद्‌गीता-अध्याय बारावा (भक्तियोग) ५७
भगवद्‌गीता-अध्याय पंधरावा (पुरुषोत्तमयोग) ६१
आई ! आम्हांला सोडून जातेस ! ६५
संध्याकालीन वसंतवायूस ६६
विरही ६९
मोकळ्या मनाचें गाणें ६९
मोहावृत ७०
पुष्पराजी ७०
वाम-नयन-स्फुरण ७२
घरीं वीरा मृत आणिलें तयांनीं ७२
अभागिनी ७४
पतित मातेस ७५
गुलाबी लपंडाव ८०
प्रीतीचा पर्वकाळ ८१
तिळगुळ घ्या ! गोड बोला ! ८२
लक्ष्मीपूजन ८३
करुणासिंधो दावीं मजला वाट ८३
गंगास्तवन ८४
धन्य, राजसा ! केलें मजला ! ८५
वृद्ध आंधळा – १ ८७
वृद्ध आंधळा – २ ८८
ये चिलया ! चिमण्या बाळा ! ८८
नवा मनोबोध ९०

जगू देईं सुखें तया ९१
गंगालहरींतील पहिले पांच श्लोक ९४
मानवी संसार व ईश्वरी संसार ९६
जात्याची घरघर ९७
मित्रास ९८
दयितेचा शोध ! ९९
पुष्पाभरणें १००
लाटेचा धक्का १०१
जीवितमय आकाश १०२
मंगलपाठ १०३
प्रेमाची प्रसन्नता १०४
श्रीशिवस्तुति १०५
' मुक्तावली ' - विवाह १०६
गेलें वर्ष निघून एक ! १०७
तारका १०८

## English Poems And Poetic Prose Passages

To The Rising Sun 111
Chimajee The Brave 112
In Quest Of The Lover 113
A Lament On A Sparrow's Death 114
My Grateful Soul 115
To The Evening Star 117
To The Outrageous Indian Policeman Of 1942 118
O Sweet One ! 119
A Tribute To Bapuji 120
To Spring 121
The Boys Better Every Day 122
The Beggar Child 123
Light ! O Light ! 124
O Lonely One ! 125
Rid Me Of These 126
The Captive 127
O Captain Of My Ship 128

# रसिकास

जाति - स्वर्गंगा



करीं ' गीतमंजूषा ' तुझिया देतों, सखया ! ही घेई;
आजवरी जें सांठविलें धन भरुनि हिच्यामाजी राही.
' हिरे, माणकें, मोंति, मोहरा बघतां उघडुनि दिसतील !' —
दर्पोक्ती ही व्यर्थ वैखरी मदीय नच कधि बोलेल.
परंतु रुपये हिच्यांत पडतिल नजरेला तुझिया बहुत.
हीच मनीषा वसे निरंतर दृढतर विनीत हृदयांत.
हिरे, माणकें, कांचन, मोतीं मोहित करिती धनवंता;
परि रुपयाचा नाद मधुर भरि मोदें सकलांच्या चित्ता.
रूपक-मोलाचा हा पेला मोद-रसानें भरलेला,
सेवियला एकेक तरी तव फुलविल मानस-कलिकेला;
संसाराच्या वणवण विपिनीं फिरुनी श्रमतां तव काया,
गीत-रसाचा पेला क्षम हा सान शीण न्याया विलया !
उल्हसुनी मन लाभ घडीभर होइल तुजला मोदाचा,
समर्पुनी धन लाभ बहुत मज गमे जाहला पुण्याचा.

# श्रीशारदावंदन

वृत्त–वारुणी

शारदे देवी ! जगन्माते ! तुझ्या मी लीन पायीं,
भक्तिभावें वंदितों त्वत्पादपद्मा स्फूर्तिदायी !
त्वत्कृपेचा लाभ दैवें जाहला मातें म्हणोनी,
येति हे बाहेर माझ्या बोल वाचेंतूनि कांहीं !
बोल माझे बोबडे ऐकूनि आई ! कौतुकानें
चंद्रिका त्वल्लोचनाची आननीं संचारुं देईं !
भावपुष्पें ओवुनीयां गुंफिली माला तयांची,
प्रीतिनें अर्पावया पायीं तुझ्या आनंद होई !
रंग पुष्पा साजिरा ! कीं गोजिरें तद्रूप साचें !
मानसा वायूसवें आंदोलुनी तद्‌गंध मोही ! –
भाव ऐसा मन्मनीं नाहीं अहंकारी उदेला !
भावभक्तीची तुला ही अर्पियेली भेट पाहीं !
पूजितों मी प्रेमभावें वाहुनी ही पुष्पमाला,
पत्र-पुष्पा गोड माझ्या, वत्सले ! मानूनि घेईं !
त्वत्कृपेचा हात माझ्या मस्तकीं राहो सदैव !
अंतरींची ही मनीषा पूर्ण माझी होउं देईं !
भक्तिभावें वंदितों मी तूझिया पादांबुजांतें !
वंदितों आई ! पुन्हा गे वंदितों ! घे वंदना ही !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८५२
ग्रंथ : ...

## शारदेच्या चरणीं

वृत्त–गीतिका

खुडिलीं फुलें बघ शारदे ! हृदयांतल्या वनिकेंतलीं,
वनमाळ ही चरणांवरी तव वाहण्या नव गुंफिली !
मधुगंध ये हिजला न वा, मज हें मुळीं समजेचिना,
उपहार उज्ज्वल प्रीतिचा, करणार का अवहेलना ?
नजरेंतली फिरतां जरा तव हीवरी मधुमोहनी,
खुलतील वासव–चापसे निमिषांत रंग तरंगुनी !
भरतील नंदन–गंध सुंदर सर्वही भुवनांगणीं,
अलिवृंद मंजुल गुंजुनी रस चुंबितील विमोहुनी !
नच वर्षतां बरसात ती तव प्रीतिचीच सुधामयी,
झळ लागुनी विष–वायुची चिमणीं फुलें सुकतील हीं !
फुलवीं तरी फुलत्या जिवां मधुदृष्टिचें जल सिंचुनी,
कवळ्या उन्हामधि खेळतां बघ कौतुकें निज अंगणीं !
चिमणीं फुलें – चिमणीं मुलें – चरणांवरी तव वाहिलीं,
पदरांत झाकुनि आपुल्या झणि चुंबि हीं मम सोनुलीं !

## स्वात्मार्पण

वृत्त–मंदारमाला

विद्या, सुहृद्, संपदा, कीर्ति, नादीं ययांच्या फुका काल हा लोटला,
दीनाननीं भाकितां बांधवांची कृपा देह भारी असे भागला;
सत्प्रेमसंसक्त ही मूढ आशा निराशातमीं घोर भांवावली !
अंगारसी संसृती जाळिते, जी मुदें मोहुनी पुष्पसी चुंबिली !
शीडाविना कर्णधारविना हें असें भग्नरूपरी जीवित,
संसारसिंधूवरी वायुलाटांसवें संचरें, ना दिशा निश्चित !
इच्छा सुखाची अशी कोणतीही मुळीं मानसीं वावरेना अतां;
कोठें असा सारखा वाहुनियां स्थिरावेन कांहीं न ये सांगतां !
गे शारदे ! पादसेवेविना ना तुझ्या आस आतां दुजी मन्मनीं;
विद्या, कला, संपदा, कीर्ति, मोदें पदीं अर्पितों तूजसी वंदुनी !
तूं प्रेम, तूं धाम, संसार सारा जिवा पाउलें हीं तुझीं गोमटीं;
तूं तार वा मार, हा जीव भावें असे वाहिला तूजला शेवटीं !
त्वत्प्रेरणेनेंच गे मन्मुखीं ही अशी पाझरे आरती सुंदर;
ओवाळ ती तूजला तूंच आतां करीं आपुल्या घेउनी सत्कर !

## नर्तन

जाति—'मनमोहन' सारखी

चल, असाच शिकवीं नंदकिशोरा ! आम्हां नाच हा ! ॥ ध्रु ॥

घागऱ्या पायांत घुमती,
मधुर नादें ठुमकताती,
थयथयाट मुरलीरवाबरोबर करितो साथ हा !

अंगुलीच्या येरझारा
सप्तरंध्रीं या झरारा,
मधु गीततान, मौलिचें विधूनन, मोही मन अहा !

दिव्य तूझी अधरमधुरा
पिउनि झाली मत्त मदिरा
बघ वेणु, नाद नंदनीं सुधेचा वर्षी सेक हा !

मौलिमाला कालियाची
रत्नपंक्ती तदुपरीची
निज तेजें प्रक्षालिते सुकोमल तूझा चरण हा !

जहरि भारी सर्परसना,
जाळ जहरी दशदिशांना;
कडकडुनी चपला परी सुधेचा सोडीं सिंधु हा !

रान हें कांटेरि किर्र,
चरणकमलें मृदुल फार,
स्पर्शें तव सोज्ज्वल सुमनशेज तें झालें ना पहा !

मालतीची मृदुल शेज
सुखद पहुडायास सहज;
परि सूचिशेजही सुखदच व्हाया पढवीं योग हा !

परिमलें निःश्वास हसती,
अश्रु पुष्पें उधळिताती,
मधु गीत रोदनें आलापूनी भरिती नभ अहा !
अमृत आहें अमृतरूप !
विषहि गर्भी सत्स्वरूप !
विष सुधा, सुधाही विषच, भेद ना, स्फुरला बोध हा !

## सांजतारा

वृत्त--जगद्बन्ध

कुणाच्या रम्य आरामीं हसे हा चारु निशिगंध ?
तयाचें मंजु मधु तेज धरेला न्हाणितें मंद.
विराजें मोतियांचें हें निशेच्या दारिं तोरण का ?
तयांतिल दिव्य कौस्तुभ हा द्युतीनें डोलतो देखा !
नभींच्या मानसीं फुललें नवें हें शुभ्र का कमल ?
पिलें हीं राजहंसांचीं सभोतीं खेळतीं खेळ !
पताका प्रीतिची पवनीं धवल गगनांत फडफडते !
निराशातिमिर नाशोनी भरी आशाप्रकाशातें !
कुणाची नाव तरते ही सुधासंसारजलधींत ?
तिचा हा प्रेमशुभतारा सुकाणू काय रोंखीत ?
उभी सज्जांत संध्येच्या वधे वा, कोण ही रमणी ?
रुचिर हे प्रेमदृक्पात तियेचे नाचती गगनीं !
नभीं वा मूर्त विश्वाची उभी ही माउली शांत,
जगाच्या पाहतां लीला स्फुरें वात्सल्य नेत्रांत !
कवीची दिव्य कीं प्रतिभा अनंतीं लीन बेमान !

प्रमोदें नि:स्वना गीती जहाली दंग ऐकून !
जहाजे सफर करितात कुणी अव्यक्त सिंधूत !
तयास्तव दीपगृह का हें विराजें दिव्य तेजांत ?
सुभग हा तिलक भालींचा असे त्रैलोक्य–लक्ष्मीचा,
द्युतीच्या भारिते गानीं जणू आत्म्यास विश्वाच्या !

## आत्मस्तोत्र *

जाति–भूपतिवैभव

मी देह नसें हा, इंद्रियगण मी नाहीं,
नच अंतरंग मी, अहंकार मी नाहीं,
मी नाहीं पंचप्राण, बुद्धि मी नाहीं,
धन–पुत्र–कलत्र–क्षेत्रापासोनीही
मी असें निराळा; आत्मा नित्य असक्त
शिव शाश्वत साक्षी मी प्रत्यक्ष विमुक्त !
दोरही भासतो सर्प जसा अज्ञानें,
हा जीव भासतो स्वात्मा संमोहानें;
निज आप्तजनांचे बोल पडोनी कानीं,
भ्रम विलया जातां दोर येतसे कळुनी;
गुरुवचनें तेवीं जाउनि मोह लयाला,
मी जीव नसें, शिव असें, बोध हा झाला !
स्वप्न कीं दिसावें जैसें निद्रामोहें,
हें विश्व भासतें असत्य मायामोहें;
ना सत्य मुळीं तें, अभासच जगताचा

सच्चिदानंदरूपांत होइ आत्म्याच्या.
मी असें शुद्ध, मी अव्यय, मी अविभक्त,
मी नित्य एक शिव पूर्णरूप अव्यक्त !
मजविना न येथें विश्व कोणतें इतर,
बाह्य वस्तु माया परिकल्पित साचार !
दर्पणीं दिसावें, विश्व तसें माझ्यांत–
अद्वैतीं भासें ! मी शिव अचल अनंत !
जन्मलों नसें मी, नसें वाढलों लोकीं,
मज विनाश नाहीं; धर्म सर्व अवलोकीं
प्रकृतीचे; घडती विकार ह्या देहास;
चिन्मयास नाहीं कर्तृत्वादिक पाश !
निज अहंकारची कारण कर्तृत्वाचें;
शिवरूप असें मी परम धाम अमृताचें !
जन्मलों नसें मी, जन्म–मरण मज केवीं ?
मी प्राण असें ना, क्षुधा–तृषा मज केवीं ?
मी चित्त असें ना, शोक–मोह मज केवीं ?
मी कर्ता नाहीं, बंध–मोक्ष मज केवीं ?

शंकराचार्यांच्या 'आत्मस्तोत्रा'चा अनुवाद.

## संभ्रम

सांग सुंदरी !
मदमंजरी !
काय म्हणुनि दृष्टि अशी तुझि ग बावरी ?
सांज अंबरीं
खुललि साजिरी,
राग अरूण तोंचि खुले का मुखावरी ?

पथि पदावली
स्खलित जाहली,
शुक्रकांति चंचल का नयनिं चमकली ?

गालिं हांसतां
ही सलज्जता –
का वदनीं प्रीतिमुग्ध नजर चाळितां ?

श्रुतिमनोहरा
प्रणयनिर्भरा –
कानिं अकस्मात कुठुनि येतसे गिरा ?

हृदिं विकंपिता ,
तनुहि पुलकिता,
सांवर हा शेला तव येइ खालता !

सुमन कोमल
पाहिं भूतल,
अंबाडा विपुल होइ शिथिल सोज्ज्वल !

अधर प्रस्फुरे,
उरज कांपरें,
घर्मबिंदु–तोरण नव भाळिं नाचरें !

ह्याच भामिनी
चतुर साजणी –
निमिषिं तुझें काढितील गुपित हुडकुनी !

जन पथांतले
कौतुकावले;
मोहकता नयनांचलिं वघति, चंचले !

हृदि तरंगले,
वदनिं रंगले,
वासंतिक मंजु मंजु रंग विकसले !
दिव्य, मंगले !
भाव वहरले !
हो लव बेहोष तुझी वृत्ति यामुळें !

## रोखीं तोफ तुझी अमोघ !

वृत्त-शार्दूलविक्रीडित

रोखीं सैनिक ! तोफ संगरिं तुझी ! रे आर्यभूमी तव
स्वातंत्र्या मुकली शतानुशतकें ! भारी पदीं लंगर
कष्टें वाहुनि अस्थिमात्र उरलीं बाळें तिचीं सुंदर !
शस्त्रास्त्रीं समरीं सुयत्न निकरीं जे मुक्त व्हायास्तव
केले, निष्फल जाहले ! शिथिल ना रे पाश होती लव !
रक्ताच्या सुकल्या नद्या न अजुनी ज्या वाहल्या भूवर !
नेत्रींच्याहि न वा उचंबळति ज्या भेदून अभ्यंतर !
नाहीं ओसरला दिगंतिं भरला आक्रोश शोकार्णव !
आलें संपत नष्टचर्य ! तिमिरध्वंसी महन्मंगल
स्वातंत्र्योदय-सुप्रभा विलसते प्राची-मुखाब्जावर !
रोखीं तोफ तुझी अमोघ ! न मुळीं लावीं विलंबा पळ !
दिव्या शक्ति करील ही जड महाभूतांप्रती जर्जर !
नाशोनी परदास्य सार्थ करिं जी हो वीरता निष्फल,
वाहूं दे विमला सुकीर्ति तव ही गंगा जगीं जोंवर !

## सोन्याचा पाऊस

जाति – चंद्रकांत

[ संध्याकाळची वेळ होती. सूर्य पश्चिमेकडे बराच खालीं आला होता. अजून सूर्यास्त होण्यास बराच अवकाश होता. सूर्याचा सोनेरी प्रकाश सर्वत्र पसरलेला होता.

पावसाळ्याचे दिवस संपले होते. तरीहि पश्चिमेकडील आकाशांत कांहीं मोठाले कृष्णवर्ण मेघ तरंगत होते. थोड्याच वेळांत ते वितळून टपोऱ्या थेंबाचा पाऊस पडूं लागला. सूर्याचे तिरकस सोनेरी किरण पावसाच्या थेंबांवर पडल्यामुळें पृथ्वीवर सुवर्णाची वृष्टि होत आहे असा भास होई.

कांहीं वेळानें पाऊस थांबला, व सूर्य अस्तास जाऊन पश्चिमक्षितिजावर विविध वर्णांच्या अनेक छटा दिसूं लागल्या.

ही अद्भुतरम्य सृष्टिशोभा पाहून पुढील कवितेंत वर्णन केलेले विचार मनांत उद्भवले. ]

सुवर्णरंगी जरतारी नव नेसुनि वसनाला,
आर्यभूमि ही कुठें चालली संध्यासमयाला ?
अस्तगिरीवर पश्चिमरमणी-हृदयानंदकर
अखिल जगाला ओज अर्पुनी भास्कर येणार;
धरून चरणीं शुद्ध भक्तिच्या गंगेची धार,
अवनत होउनि पावन ही तद्दर्शन घेणार !

मेघावलि या वेळीं का ही वितळे गगनांत ?
सुंदर पिंवळी ही सोन्याची होई वरसात !
आर्यभूमि ! हीं फुलें तुझ्यावर सोन्याचीं, बाई !
आकाशांतुनि कोण सारखीं उधळी या समयीं ?
सुरसरितेंतिल वायूसंगें उडून का खालीं
हीं सोन्याचीं कमलें सारीं शिरीं तुझ्या आलीं ?

सुरनारींनीं स्वर्गांतुनि या एकसवें काई
मोहनमाळा सोन्याच्या तव अर्पियल्या पायीं ?
ओवाळुनि तुजवरुनि काय हीं विपुल टाकियेलीं
दिगंगनांनीं सोन्याचीं निज भांडारें सगळीं ?
अभिषेकातें शिरीं करोनी सुवर्णगंगेचा,
सुरेंद्र अर्पी मान तुला का जगदधिराणीचा ?

सुंदर पिंवळी ही सोन्याची खरीच वरसात !
देवि आर्यभू ! विसर अतां तव दैन्याची मात !
दुर्भाग्याचा काळ दीर्घ हा तव संपत आला,
काळी छाया निज वदनींची नेई विलयाला !
संचित सारी तव पुण्याई आज फळा आली,
पिकतिल शेतामधें तुझ्या नव सोन्याच्या साळी !

संदेह न हा खराच आहे पाउस सोन्याचा !
गालीं विलसो स्मित तव पाहुनि हा नवलाईचा !
रविरायानें तेजःसामर्थ्येंच भारलेला
प्रसाद पावन अर्पियला हा तुज कौसल्येला !
उदरीं तुझिया घडतिल आतां मुक्ता अभिराम,
रामायण तुज सहस्र गातिल राम घनश्याम !

देवि ! उतरला अस्तगिरीच्या शिखरावर सविता,
कृपाकटाक्षें उजळी जणुं तव रेषा भाळगता !
सहस्रकिरणांमधिल तयाची दिव्य तेजगंगा
हृत्कोशीं घे सांठवून तव विमल तमोभंगा !
तच्चरणीं निज कृतज्ञ मस्तक नमवीं भावानें,
आशीर्वचनामृता तयाच्या सेवि आदरानें !

पश्चिमरमणी अनुरागानें अति रंजित झाली
प्रिय नाथाच्या सवें उतरते गिरिवरुनी खालीं.
जातां जातां देवि ! हिनें तर हृदयीं हर्षून,
शिरीं तुझ्या मंगलप्रद दिला गुलाल उधळून !
खगकूजितमय रम्य गातसे दिनमणिची राणी
तुझिया शाश्वत सौभाग्याचीं मधुमंगल गाणीं !

रजनीदेवी ! तूंहि ये अतां चंद्राच्या संगें,
तारका-फुलें आर्यभूवरी उधळ तुझीं सुभगें !
गुरू-शुक्राचे रत्नदीप तव आंदोलति जेथें,
उभार तोरण नक्षत्रांचें शुभ देवीवर तें !
वनदेवींनों ! फुलें गुंफिलीं नवरंगीं ज्यांत,
आर्यभूमिला सजवा हिरव्या शेल्यानें त्वरित !

नंदनांतला परिमल घेउनि ये, मारुतराया !
आर्यभूमिला वीणेवरती नव गाणीं गाया !
देवि शारदे ! चिर विलसो तव हास्य पुन्हां गालीं,
आर्यभूमिच्या नवरत्नाचे हार गळां घालीं !
सुवासिनींनों ! वाजत गाजत मिरवा राणीला !
सोन्याचा हा आज खरोखर दिवस हिला आला !

## कविता-कन्येस

वृत्त-शार्दूलविक्रीडित

गे बाले ललिते ! नको वदनिंची रम्या रुची मालवूं;
अश्रू सिंचुनि उष्ण, कोमल नको हे गाल कोमेजवूं;
तूतें खिन्नमुखी अशी बघुनियां मन्मानसीं कालवें;
येई दाटुनि हा गळा गहिंवरें, ना शब्दही बोलवें !
'नाहीं मोहकता मनोहर मुखीं जी रंजवी सन्मती,
टाकी बेढव पाउलें !' तुज किती नांवें अशीं ठेविती;
कोणाही रसिकास मान्य अजि तूं नाहींस गे या भुवीं,
नेत्रींचें न तुझ्या हृदंगम कुणा दिव्यत्व तें मोहवीं !
आहे काल अमूप, भूवलयही विस्तीर्ण तेवीं असें;
चिन्ता सोड पुसून अश्रु, हृदयीं धैर्या धरीं राजसे !
ईशें नेमियला कुठें कधितरी लाभेल तूंतें वर,
प्रेमें मोहुनियां तुला रसिक तो चुंबील कीं सत्वर !
किंवा, तो विधिलेख अन्यच जरी भाळीं तुझ्या रेखिला,
चित्ताची खणुनीच खांच बरवी झांकीन बाळे ! तुला !

## कलांची राणी

जाति - चंद्रकला

होति कुणी बाला कलेच्या वनवित फुलवेली,
कलेंत कोमल त्या तियेची हर्षित मति रमली;
दुरुनि देखियेलें, विमोहित शांत मानसाच्या
पृष्ठीं मम उठल्या मंद मधु लाटा कुतुकाच्या.
गमे अधिष्ठात्री कलांची मूर्तिमती राणी
उतरे पढवाया कलांचे पाठ काय भुवनीं ?

सुस्वागत देवी ! सकल हें जीवित गे अमुचें
रुक्ष तर्कटाचे हिशोबी ग्रंथ गद्य साचे !
सात्त्विक मोदाच्या वाहत्या स्वर्गंगा अमुच्या
डोह कर्दमाचे जाहल्या द्वेषमत्सराच्या !
उपवनिं हृदयाच्या वहर जो वासंतिक खुलला,
लोपुनियां त्याचा सहारा भीषण गे बनला !
चित्ताच्या गगनीं शोभले अमित इंद्रचाप,
बघतां ते आजी लोपले ठायिं अपोआप !

कलावती बाले ! गुंफ तूं सुमनांचे झेले !
मोहकतेचे हे पिऊनी पेल्यावर पेले,
मादक मधु धुंदी सारखी चढून दृष्टीला,
सुंदरतेमाजीं विहरुं दे सदैव जगताला !
कठोर हृदयाच्या कोरडचा कृष्ण शिला सकला,
मुकुलित होवोनी उधळुं दे सुमनांच्या माला !
विशुद्ध आनंदा सेवण्या क्षम मानस व्हाया,
कलाभिज्ञ जादू गोजिऱ्या अंगुलींत तुझिया !

तुझी कला-कुसरी चालवी संतत मधु बाले !
मन्मन सौंदर्या सेवितां उन्मादें भरलें !
रंगहि पालटले जगाचे जड-स्वरूपाचे !
अभिनव रंगांहीं रंगलें अखिल विश्व साचे !
दिशांदिशांमाजीं पाहतों स्वप्नें सुंदरशीं !
बघतां सौंदर्या चढतसे धुंदी हृदयासी !—

"सडे सुवर्णाचे घातले दारीं संध्येच्या;
चरोनियां रानीं परतल्या धेनू तारांच्या;
ऐकाया साऱ्या ठाकल्या उभ्या अंगणांत,
सुस्वर मुरलीचें सोडितो मुकुंद संगीत !
निनाद मंजुळ ते घुमोनी पवनलकेरींत,
पडोनियां श्रवणीं मोहरे वृत्ती हृदयांत !
... ... ..."

## अभिसारिका

वृत्त - शार्दूलविक्रीडित

ये, भेटेन तुला नदी-तटिं, सखे ! त्या आंवराईमधें !
येई सत्वर वांकल्या फलभरें मोठ्या तरूखालतीं !
आश्वासी निशि नाथ मंजुल रवें स्वप्नीं स्वकांतेप्रती !
सोडोनी शयना उठे मग क्षणीं वाला प्रभातीं मुदें !
केसांची करुनी सुरम्य रचना, त्या भूषवूनी सुमीं,
भाळीं कुंकुमकोर मंगलमयी रेखोनि रम्याकृति,
नेसोनी रुचिरा सुनील वसना, जाया रिघे सन्मति !
घ्याया आतुर नाथदर्शन पथा तन्वी मुदें आक्रमी !
येई तैं अभिसारिका प्रणयिनी सिंधूतटीं मोहिनी
संकेतस्थलिं !–वाहती सुविमला प्रेमांबुची निर्झरी !
नाथा शोधित मूढ खिन्न हृदयीं येथें तिथें भोवतीं,
जाई घोर वनोवनीं ! गिरिदरी लंघी पिशाचीपरी !
अन् केव्हां फिरुनी कुणास दिसली कोठें दुजी ती रती ?
साक्षी केवळ रान, डोंगर, नदी ! त्यांना पुसा जाउनी !

## पाहूं कुठें अतां तें !

जाति - रसना

पाहूं कुठें अतां तें ! हें ओस रे दिगंत !
भरलें जगांत होतें घनदाट तें अनंत !
मार्गांतुनी रिघावें, तों तेधवां दिसावें !
तें धूलिच्या कणींही वायूसवें उडावें !
सुकल्या तृणामधेंही दिव्यत्व तें स्फुरावें !
फुलल्या फुलामध्यें का मग तें न संचरावें ?
संजीवनी मृताच्या खेळे कलेवरांत !
पूर्णेन्दुच्या न केवीं मग ती सुधाकरांत ?

रुदनांत भासणारें, हास्यांत हांसणारें,
शीतांत शोभणारें, उष्णांत नाचणारें,
संध्येंत बोलणारें, अरुणांत रंगणारें,
गगनांत तारकांच्या मालांत डोलणारें,
विश्वास व्यापणारें, तें लोपलें अतां रे !
अंधार अंतरंगीं भरला कसा अरेरे !

नुसत्याच वस्तु आतां वस्तूंत भासतात !
हा ! हाय ! पाकळ्यांची मालाच रे फुलांत !
रुदनांत अश्रुधारा या केवलाच पाहीं !
हास्यांत हासण्याच्या कांहींच पार नाहीं !
बोलांत शब्द अंतीं ! आलाप गायनांत !
शांतींत शांततेचा आधार होइ लुप्त !

बघतों वळून मागें, दृष्टी पुढें करीतों,
मंदावल्या पदांनीं मार्गास आक्रमीतों.
दृष्टीपुढें निराशा— तम घोर हें भरून
निस्तेज आननानें पथिं चालतों दुरून !
हुरहूर अंतरंगीं अति दाटली शमेना !
शमणार केधवां ही कैशी मला कळेना !

## महात्माजीस

जाति – कोकिळा

ऊठ महात्मन् ! परसत्ता ही नेईं विलया क्षणीं !
अखिल विरागी सज्ज जाहली जनता समरांगणीं ! ॥ ध्रु. ॥

ओठीं येई फेस कष्टतां,
घांस मुखींचा हिसकी परता !
सैतानी ही कृती तत्वतां !
कनवाळू रे करूणावंता अवतरसी सन्मणी !

न मिळे बाळा थेंब दुधाचा,
अश्रुपूर नच खळे सतीचा !
घोट घेउनी तद्रक्ताचा,
गर्जे राक्षस अदय, " वधू ही पुष्ट किती देखणी ! "

किती काळ हा जाच सहावा ?
अनुदिन कष्टें जीव खचावा,
परि न भुकेला कण गवसावा !
लवहि सुखाची आशा नुरली पारतंत्र्य जीवनीं !

सहनशक्तिची हद्द जाहली,
बळें ताणितां अखेर तुटली !
मनोवृत्ति बेहोष जाहली,
वीरत्वाची ज्योत पेटली हृदया-हृदयांतुनी !

करिं कसल्याही रे हुकुमाला,
तत्पर सगळे पाळायाला !
जीवन-मरणाची न कुणाला
कदर ! दिलेसें राष्ट्रप्रेमीं सर्वस्वा होमुनी !

निर्दय, पापी, पाशवि सत्ता
नेई विलया ! दवुनि जगता
तव अस्त्राची दिव्य क्षमता !
फडकवि विजयी झेंडा स्वातंत्र्याचा गगनांगणीं !

परसत्तेचा प्रखर उन्हाळा
साच असे रे आज संपला !
स्वातंत्र्याची जलधर-माला
शीतल वर्षुनि करिल आर्यभू रुचिर स्वर्गाहुनी !

## कांजवे

जाति – चंद्रकांत

अस्तगिरीवर संध्या हसते गालींच्या गालीं,
मधु प्रभा ती पुसट पसरली विश्वाच्या भाळीं.
रजनीदेवी ध्वजा शांतिची धरूनियां आली,
नील फुलांची तिजवरती ही वृष्टि कुणीं केली ?

त्या सुमनांचा हारच सुरुचिर दिव्य पडे साचा—
निर्झर कुंजावरी चमचमे वृंद कांजव्यांचा.
किंवा, आली रजनीदेवी, भूवला तिजला
नेसुनि भेटे टिकल्यांची का सुंदर चंद्रकळा ?
अथवा, रजनी-चंद्राचा या कुंजवनामाजीं
विवाहविधि मंगलमय होई थाटाचा आजी;
निर्झर गातो वायुसख्यासह मधु मंगलपाठ,
'शुभमंगल ! सावधान !' वदती वनमाला त्यांत;
वधू-वरामधिं वनदेवींनीं धरिला हातांत
अन्तःपट का मोत्यांचा हा लकलकतो येथं ?
एक सारिला अन्तःपट, परि लज्जेचा दुसरा
मुग्ध नोवरी रजनी वदनीं धरुनी स्मितमधुरा,
अपांगनयनीं सुधाकराची वदनसुधा पिउनी,
तदीय कंठीं प्रमोदपुलकित कंपित हातांनीं
अर्पितसे जणु प्रेमगुणांनीं गुंफियली रुचिरा
मधुमालतिची धवलविलोला ही मंगलमाला !
यदुकुलदीपक, अथवा वाटे, मनमोहन कान्हा
वंजुल-कुंजीं वाट पाहतो प्राणसखीची हा;
दृष्टिस पडतां प्राण-विसांवा वनमाली येथं
गोपबालिका मुग्ध राधिका आनंदित होत;
पुलकित होउनि अनुरागानें तनुलतिका सकल,
शिथिल जाहला रुचिर तियेचा केशपाश विपुल.
केशविभूषण मधु गंधाचे त्यासरसें सारे
जाइ-जुई-मोगरिचे का हे ओघळले गजरे ?
मेळवुनीयां, अथवा, मेळा गोपींचा आजी
स्वच्छ मनोहर चांदण्यामधें वृंदनवामाजीं

गोफ खेळतो विश्वविमोहन कृष्ण सखा मोदें
झुलवित भुलवित मुग्ध वधूंना मधु मुरली-नादें;
प्रेमनिर्भरा लोललोचना वळवुनि त्या मान,
सर्वेचि बघती हळूंच लाजत हांसत तद्वदन,
भावभक्तिच्या पाजळल्या जणु नीराजनज्योती,
मधु तेजाचीं नवनयनें का त्यांचीं लखलखतीं ?
किंवा, का ही काव्यदेवता शांत निकुंजांत
भूर्जपत्रिका अवकाशाची धरुनी हातांत,
स्वर्ग-धरेचा प्रेमसमागम अनुपम गुंफीत
रुचिर रुपेरी रसें बैसली मधु गाणें लिहित ?
अर्ध्या लिहिल्या त्या गाण्याच्या सुंदर पदपंक्ति
मुक्तावलिसम रम्य रुपेरी तेजें चमचमती !
कुंजवनीं चौफेर तारकासम विलसें तेज,
दीपोत्सव जणु वनदेवीचा मनमोहन आज !
नाचत हांसत स्वर्लोकांतिल बाळांचा मेळा
स्वर्गामधुनी खेळायाला भूलोकीं आला ?
कुंजाकुंजांतुनि बाळें हीं डोकावुनि बघतीं,
दिव्य तयांचीं मुखकमलें का तेजें चमचमतीं ?
ब्रह्मांडाचा जादुगार का भारुनि जादूनें
वायूवर शत दिव्य अप्सरा नाचवि लीलेनें ?
विश्वेशाची विश्वमोहिनी कीं मंगलमाया
ब्रह्मांडाला तीन गुणांनीं क्षम न विमोहाया;
मंदनील तेजाचा अभिनव अद्‌भुत जादूचा
चवथा भरुनी, इंद्रजाल विणि, गुण हा मायेचा !

## प्रेमाकुल संध्या-तारकेस

वृत्त – शार्दूलविक्रीडित

सौंदर्यद्युति फाकली मधु तुझी गे तारके ! कोमला;
मोदें मोहक तूझिया विकसली गालीं स्मिताची कला;
हृद्‌गंगेस अथांग पूर तूझिया प्रेमांबुचा लोटला;
दृष्टी नाथहृदंतरास सजली मोहावया सोज्ज्वला.
बाले ! नाथ तुझा पराङ्‌मुख परी, ना कल्पना ही तुला !
प्राशोनी मदिरा जडत्वजनिता बेहोष हा जाहला !
उन्मादावरणीं अभेद्य लपले याचे सुहृद्वैभव;
सौंदर्य, प्रणय, प्रमोद तव ना मोहील त्या स्वर्भव !
जा जा, फेंकुं नकोस, मुग्धमधुरे ! दृक्‌पात हे अंबरीं !
प्रेमें पश्चिम-माउली निजसुता घेईल अंकावरी !
राहीं आजि तिथें सुखें पडुनियां प्रीतीमधें गुंगुन;
स्वप्नीं त्वत्स्फुरदंतरास वितरो शांति प्रियालिंगन !
धुंदी ओसरतां उद्यां नयनिंची नाथाचिया निष्ठुर,
प्रेमव्याकुल तो स्वयेंच तुजला चुंबील गे सत्वर !

## इंद्रचाप *

जाति – देवद्वार

उसळे आनंद माझिया अंतरीं,
देखतां अंबरीं इंद्रचाप;
जीवना आरंभीं बाळ होतों सान,
वृत्ति तैं समान होती माझी;
काळ तारुण्याचा आजी लाभे मातें,
वृत्ति प्रकटते तीच देखा;

राहो वृत्ति ऐसी वृद्ध जैं होईन,
ना तरी निधन होवो माझें !
फुलती मानवीं शैशवीच्या वृत्ति;
वसतसे चित्तीं हीच आस –
निसर्ग-प्रीतीनें दिन माझें व्हावें
एकमेकांसवें निगडित.

* वर्डस्वर्थ कवीच्या ' द रेनबो ' ह्या कवितेचा अनुवाद.

## ओवाळणी ही धर !

वृत्त-शार्दूलविक्रीडित

भाऊबीज म्हणोनि आज भगिनी ! तूं रौप्यनीराजन–
घेवोनी तवकीं, शिरीं मम शुभा या अक्षता टाकुन,
गालीं मोदभरें हंसून, मजला सप्रेम ओवाळिसी;
'भाऊ काय अमोल घालिल बरें ओवाळणी !' पाहसी.
देखोनी सकुतूहला तव अशी साकाङ्क्ष दृष्टी परी,
वृत्ती कालवुनी, मदीय पसरे अंधार अभ्यंतरीं !
स्नेहाळे ! न सुवर्ण–खूण वरवी ती प्रीतिची सुंदर–
अर्पायास धजे मुळींच तुझिया पात्रांत माझा कर.
दास्याच्या चिर रौरवांत रुतली ही आर्यभू दुर्भगा;
तीची केवळ नामशेष अभिधा हो 'रत्नसू' या जगा;
पोटातें मिळवावयास तुकडा तीच्या प्रियां लेकरां,
वस्त्रावीण, बनून दीन, करणें देशोधडीं आसरा;
त्यांचीं संतत आंसवें गळुनियां हा सांचला सागर;
तद्रत्नें बघ ओजळींत भरलीं, ओवाळणी ही धर !

## भंगलेलें देऊळ

वृत्त - वारुणी

डोंगराच्या पायथ्याशीं गांव होता थाटलेला;
गाउनी दे गोड त्याच्या साथ ओढा वैभवाला.
जीवनाचें गोड होतें संपलें संगीत त्याचें;
तोच येथें खिन्नतेनें गाइ गाणें शून्यतेचें.
भग्न भिंतींच्या घरांचें भूतलीं विस्तारलेले
दीनवाणे सर्व ठायीं शेष होते राहिलेले.
जीवनाची मानवाच्या जाहलेली धूळधाण
पाहवें कोणा नभावांचून आतां ही भयाण ?

आणि येथें भंगलेल्या देवळाचें अंतरंग
मृत्तिका-राशींत दावीं भंगलेलें सांबलिंग.
जीवनाची वेल होती येथं जेव्हां जोमदार,
शोभले तन्मस्तकींचे वाहिलेले पुष्पभार.
ईशगीतें सांद्र सारा जेथं झाला आसमंत,
काढिती घूत्कार आजी धूक तेथें मंदिरांत.
धूप-कर्पूरादिकांचे कोंदले सौगंध जेथं,
वायुवीची नित्य दुर्गंधी तिथोनी आणितात.

भाविकांच्या अंतरंगांतील कारुण्यप्रवाह
वाहले तैं पाहतांची अंध-पंगु-क्षीणदेह
देवदारीं बैसलेले; ते मनींचे गोड भाव,
भग्न मूर्तीतील अन् का लोपलासे ईशभाव ?

‘भाव दैवी ईशतेचा ईशमूर्तीमाजि राही,’
कल्पना ही मात्र खोटी प्रत्ययासी येथं येई.
‘मानवानें देव केला, देव सेवी मानवाला’ –
हेंच भासें मन्मनाला, अन्यथा वाटो कुणाला.

ईशभावाची स्फुरे ती ज्योत जेव्हां अंतरांत,
खूण देव्हाऱ्यांत ठेवी बाह्य तीची मूर्तिमंत !
मूर्तिपूजा निंदनीया यास कोणींहि म्हणावें;
अंतरींच्या ईशभावा पूजितो तो आत्मभावें.
नातरी विच्छिन्न होतां मांडलेला हा पसारा,
ईशमूर्तींतील गेला भाव दैवी केविं सारा ?
वास जेथें ज्या कुणाचा, तेथं राही देव त्याचा !
शोधणें त्या अन्य ठायीं व्यर्थ आहे व्याप साचा.

देव नाहीं मंदिराच्या कोंडलेला अंतरांत !
देव नाहीं स्वर्गलोकामाजि केव्हांही रहात !
मानवाच्या मानसींचा ईश शोभे राजहंस;
सांठवीलें अंतरंगीं मानवानें मंगलास !
मानवाच्या हृत्सरोजीं राजताहे देवराणा;
तेथं आहे नित्य त्याचा ठाव आणी ठिकाणा.
शोध घ्यावा अंतरंगीं, शोध घ्यावा हृत्तरंगीं,
शोध घ्यावा आत्मरंगीं रंगुनीयां एकरंगीं !

## आहेस तूं जगीं या !

वृत्त - रसना

आहेस तूं जगीं या ! का अन्यथा वदावें ?
नाथा ! म्हणोनि तूंतें मी वाहतें स्वभावें.
येवोनि सागराची कल्लोलमालिका ही
उदरीं बघे हराया, हरलें न मी तरीही !
हे भोग भोगण्याला उरलें अजून देही !
उरणार साच वाटें कल्पांत पातलाही !
दुःखास दुःखता अन् सौख्यास सौख्यताही
नसतास तूं जगीं रे कोठून लाभती ही ?
येवो सुगंधवीची वायूसवें विलोल,
फूत्कार वा विषारी येवोत ते कराल,
मातें प्रसन्नता रे उभयींहि लाभताहे !
हीं अंबुजें करींची तुझियाच का न पाहें ?
नाथा ! उगीच आतां का मी विमूढ व्हावें ?
आलिंगनास तूझ्या का प्रेमला ! मुकावें ?
दोन्ही विशाल तूझे पसरून प्रेमबाहू
हृदिं आपुल्या मला तूं धरिं आवळून पाहूं !
स्वानंद लोटलासे उसळून अंतरंगीं,
मी-तूंपणास संगीं रंगीव एकरंगीं !

## संध्यातारकेचें दर्शन

जाति – सारंगी

का बघतां तुजला हृदयाची मम तरलित होई ज्योति ? ॥ध्रु.॥

ओढणी लागे जिवाला,
पंख फुटले कीं तयाला ?
का इंदुदर्शनें सिंधुस येई मम हृदयाच्या भरती ?

मेघ तव तेजाळ गगनीं
फाकलासे शांत किरणीं,
मनमोर पाहुनी समोर माझा नाचे हर्षित-वृत्ती !

पश्चिमेच्या मधुवनींचा
डुले हंसरा नव द्युतिचा–
तूं गुलाब, मन्मनबुल्बुल निरखी प्रेमें फुलुनी दृष्टि !

शिरिं सुमांचा मुकुट धरिला,
कंठिं ल्याला सुमनमाला, –
तूं वसंत येतां, हृत्कोकिल मम गाई पंचमगीति !

निदाघें मद्‌भूमि विकाला,
चित्तवनिंच्या वेलि सकला
हा वर्षानिल तव मोदें उत्सुक आलिंगाया चित्तीं !

विरहदीना बालललना
चिरागत पाहून रमणा,
हो प्रणयपुलकिता, तेविं समुत्कट होइ मदंतरवृत्ति !

दूर गेली त्यजुनि माता,
बाळ होई विकल रडतां,
तद्वदन जेविं हो प्रफुल्ल देतां फिरुनि माउली भेटी !

जननि माझी तूंच करुण,
बाळ तूझा मी ल्हान,
हे थोरपणाचे मृण्मय सकलहि पाश मनींचे विरती !

जडभवाच्या शृंखलांनीं
थोरपण हें बद्ध भुवनीं !
तव खुल्या अंगणीं बाळच अक्षय रांगत राहिन भवतीं !

थोरपण हें अत्रींचें
मज नको वा परत्रींचें !
ह्या लहानगा लडिवाळ खेळवीं वत्सल हृदयावरती !

धरीं कुरवाळून हृदयीं
चुंबनांसी अमित घेई !
त्वद्हृदयीं सामावली अखिल मम शाश्वत सुखमय सृष्टि !

लौकिकाची धरिलि आशा,
भाळिं लिहिली परि निराशा !
असहाय विषम-संसारकाननीं झालों शिणुनी कष्टी !

जड-सुखाची मन्मनीषा
वितळली गे याच निमिषा !
सुख चिन्मय अविरत अनंत वितरी मज तव सुरुचिर दृष्टि !

घालिं आतां रुचिर झूल
चिन्मयी ही तव अमोल !
मन्नयनीं भरली चिरनिद्रेची अनंत गुंगी चढती !

शांत अवनी ! शांत गगनीं !
विपिन डोलें शांत पवनीं !
मधु नितांत शांती चिन्मयतेची फुलली विश्वावरती !

## कवि बाळा रे !

जाति – कोकिळा

बाळ कोकिळा कवि बाळा रे ! बोल तुझे मधु बोल ! ।।ध्रु.।।

खोल आपुलें हृदय चिमुकलें,
बोल ऐकण्या प्राण भुकेले !
झुळझुळ गाणें वाहुनि, सगळें–
रान रुक्ष रे नंदनासवें लवलाही हें तोल् !

भीति कशाची ? आणि कुणाची ?
वृत्ति टाकुनी संकोचाची,
खुल्या दिलानें ये हासतची !
म्लान आनने निज गाण्यानें हासवि सांजसकाळ् !

तारका नभीं या लुकलुकती
रजनीच्या मृदु अंकावरती;
तयांसि गा अंगाई-गीती !
तुझाच भारी लळा तयां मग कोण गडे निजवील् ?

सुमन-बालिका तरुलतिकाची
डोलडोलुनी दमली साची;
दृष्ट लागली दिगंगनांची !
सुचे न कांहीं, भयें माउली दिसे तिची व्याकूळ् !

तव गाण्याची दिव्य मोहनी,
हसवि तियेला, त्वरित टाकुनी !
सुवर्ण पात्रीं येइ घेउनी
मधुर चंद्रिका-दूध, पाज तें तूंच अतां तिज, बाळ् !

उदयगिरीच्या मागें लपली –
उषा सुंदरी, पहा, हांसली !
पूर्वदिशेसह ही सांपडली –
तुझ्या करीं ! मधु गाण्याची तत्कंठीं घालीं माळ् !

संध्येसंगें जा स्वर्भुवनीं,
दिव्य गायना ये लाजवुनी !
विश्व टाक हें क्षणिं भारोनी–
निज गीतांनीं ! सत्य बोल तव बोल वाळ ! अनमोल् !

म्हणेल कोणी वेडा तुजला;
तोच असे रे सर्वथा खुळा !
केविं कळावा मूढमतीला –
दिव्य भाव तव हृदंतरींचा, तमीं बुडे जो खोल् !

## कोकिळेस

**वृत्त – शार्दूलविक्रीडित**

वाहूं दे मधु सूर सुंदर तुझे हे, कोकिळे ! सारखें,
न्हाऊं दे अखिला धरेस विमल त्वग्दीतगंगेमधें !
नांदे रुक्ष भयाणता भुवनिं या सर्वत्र, गीतांबुधे !
येई नीरसता चराचरिं ! दिसें हें चारुतें पारखें !
नेत्रांतें दिसते कुठेंहि न जरी मूर्ती तुझी, गायिके !
विश्वात्मा सुनिगूढ जेविं भरला चिद्रूप विश्वामधें,
तेवीं भाव तुझा मनोज्ञ विलसे गीतात्म सृष्टीमधें !
तन्नदें अनुनादला समरसें भूगोल सर्वात्मकें !
सोडीं मादक शांत सूर चढता एकेक तूझा अतां,
प्राशाया श्रवणीं सुरेल सजलों संमोहिनी ही सुरा !
सोत्कंठा पिउनी मदीय चढला उन्माद अभ्यंतरा !
मायानिर्मित लोपली विषमता यामाजि गे सर्वथा !
धुंदी सुंदर राहुनी सतत ही बेहोषवृत्तींतली,
पाहूं दे मजला अनंत मधुर स्वप्नें अनंतांतलीं !

## सख्या कोकिळा, ये ये ये !

जाति - बालानंद

सख्या कोकिळा, ये ये ये !
सुस्वागत तव ! ये रे ये !
वसंत ऋतुच्या प्राणा ! ये !
मोदाच्या सुरसरिते ! ये !
    संज रंगली,
    कांचनि फुलली !
गात गात नव गाणीं ये !
सुस्वागत तव ! ये रे ये !

मोहोर आंब्याचा फुलला,
मंडप केला तिथें तुला !
सुगंध भरला मनोहर,
खुलला चित्ताचा नूर !
    गुलाबमाला,
    सुवर्ण शशिला –
मधें ओवुनी, पूर्वा ही
गळां घालण्या तव येई !

भवशिशिरें स्थिरचरावरी
जडता पसरुनि आजवरी,
औदासिन्यें चित्ताच्या
वृत्ति बधिरल्या जगताच्या !
    प्रेमचित्कला
    तेजोविमला
विकसवुनी हृदयीं-हृदयीं,
प्रेमाचें गाणें गाई !

चित्ताच्या चैतन्याचें,
आत्म्याच्या आत्मरसाचें,
विश्वाच्या विश्रांतीचें,
गुह्यांतिल गुह्यतमाचें,
गाणें गा तें
सुधेस हसतें !
लवलाही टाकीं, सखया !
जगताच्या मोहुनि हृदया !

स्फूर्तीचा देउनि मंत्र,
मोहाची उजळुनि रात्र,
जडतेचे तोडुनि पाश,
घेउनि जाईं जगतास
सदैव गगनीं
वातावरणीं
चैतन्याच्या विहराया
आनंदें संगें तुझिया !

हेंच हेंच रे गमें असें
कार्य नियोजित परमेशें
तुजलागी या मधुमासीं !
प्रेषित त्याचा तूं अससी !
दिव्यत्वाची
चिरसौख्याची
पंचमातलीं मधु गीतें
पढवियलीं त्यानें तूतें !

गा सखया ! स्वच्छंदानें !
गाण्यानें झुलवीं रानें !
दे फुलवुनि नक्षत्रांना,
मधु सोडुनि गगनीं ताना !
एकरसाची
अभिन्नतेची
टाक मोहनी चराचरीं !
सुस्वागत तव भूमिवरी !

## प्रभात

वृत्त-शार्दूलविक्रीडित

झाली पूर्वदिशा सुरक्त; इतरा सानंद हास्यानना !
वायू मंद सुगंध रम्य कथितो वार्ता शुभा भू-वना :–
शैलाच्या शिखरीं चढून जगता न्हाणील तेजें कुणी,
उल्हासोर्मि चहूंकडे उसळतां हांसेल तेजोमणी !
चिन्हें स्पष्टच हीं ! दिसेल अचिरें सर्वांस पूर्वांगणीं –
आला दाखविण्यास नूतन दिना ध्वांता नभीं नाशुनी.
सृष्टीचें मधु चित्र हें निरखतां आनंद होई खरा,
चित्तीं व्याकुलता भरें, जसजसा त्या रंग ये साजिरा !
चित्ताच्या क्षितिजावरी निविड हा अंधार माझ्या भरे;
गेले भावहि काळवंडुनि महानैराश्यरोगज्वरें;
होई अंधुकही मुळींच न कुठें तें चिन्ह दृग्गोचर,
दिव्योल्हास-दिनोदया सुचवि जें संहारुनी काहुर !
वैषम्यें हृदयांतलीं निरसुनी दिव्यांशुभास्वन्मन,
भानो ! हें तव केधवां समरसें ऐश्वर्य मी पाहिन ?

## श्वान-क्रंदित

वृत्त-शार्दूलविक्रीडित

आनंदी भरला आनंद शहरीं ! आहे दिवाळी खरी !
ल्याली श्यामल ही म्हणोनि रजनी श्रृंगारदीपावली !
झालीं दंग चहूंकडे उडवितां दारू, फटाके मुलें !
भाऊ-बीज म्हणोनि बंधुभगिनी आल्या मुदें भेटण्या !
श्वाना ! बैसुनि या परंतु समयीं अंधारिं कोठें तरी,
का तारस्वर दीर्घ एकच असा त्वां सोडिला अबरीं ?
चित्तीं आठवलें तुला तरि असें हें काय जन्मांतर ?
जेणें व्याकुळ जीव होवुनि करी हृद्भेदि आर्तस्वर !
हो, आहेस इमानि शेतकरि जो त्याचाच तूं चाकर,
ज्याचा शेतमळा उजाड बनला, नाहीं सुवृष्टी तयें;
त्यांतोनी परकीय राज्य, म्हणुनी नानापरी गांजला,
नाहीं अन्न, न वस्त्र, दीन बनुनी देशोधडीं लागला !
त्याचा हा अवकाळ ! काय तुज ही आहे दिवाळी तरी –
त्याचा हा अवकाळ पाहुनि कसें ना चर्र होई मनीं !

## दोन करुणाश्रु

जाति – दिंडी

श्वान सडकेच्या कडेला बसोनी
सांजकाळीं राहिला एक कोणी;
दिसत होतें मुख तयाचें मलूल,
व्याधिपीडित तो साच कीं असेल.

तेथं पोलिस बंदूकधारि आला;
आणि रोखोनी स्वीय बंदुकीला
तयें त्याच्यावरी झाडियेली
अदय-हृदयानें त्वरित एक गोळी.

मर्मभेदी ती शिरे हृदयिं गोळी;
दीर्घ किंकाळी श्वान तयें वेळीं
हाय ! फोडी ! प्रतिनाद नभीं तीचा
घुमत राही चिरकाल आर्ततेचा.

आणि मूर्च्छा तत्क्षणीं येउनियां
श्वान धरणीवर लागला कलाया;
तोंच त्याच्या ये रक्त उफाळून
नाक-डोळ्यांतून, मुखांतून !

देह भूवर रक्ताळल्या मुखाचा –
पडे, तुटला तरि बंध ना जडाचा –
मुक्या जीवाचा ! करिति हाय ! यत्न
पाय त्याचे किति व्यर्थ धडपडून !

पुन्हां पाहुनि त्यावरी झाडियेल्या
पोलिसानें आणखी दोन गोळ्या;
तोंच त्याचा व्यापार होइ थंड !
पडुनि राही निष्प्राण देहदंड !

नेत्र उघडे, उघडाच राहियेला
लाल जबडा तैसाच वासलेला;
पाय मागिल मातींत लांबवीले,
गगन निरखीं चिर उदर तें मळालें !

जरी श्वाना ! खेडयांत राहतास,
कुणा धनगर वा शेतकरि जनास
प्राणप्यारा होऊन आयु खास
सार्थकीं तूं आपुलें आवितास !

धन्यतेचे उद्‌गार मुखांतून –
काढिता तो गुण तुझे आठवून !
असति तुजला अन् तयें अर्पियेली
माळ अश्रूंची तुझ्या अन्तकाळीं !

मरुनि पडसी परि आज येथं हीन !
कींव मुळिंही रे कुणा तुझी ये न !
परी मन्मन तुजसाठिं रे द्रवून,
गाळितों मी करुणाश्रुबिंदु दोन !

## सीमोल्लंघन

वृत्त–शार्दूलविक्रीडित

आला ना दसरा ! सणांत सण हा आनंददायी खरा !
सौख्याची लयलूट आज ! मुखडा होवो पुरा हांसरा !
गेले दुर्दिन ! रम्य सस्य-वसना नेसून हांसे धरा;
गातो गीत तियेस, घेत गिरक्या वाराहि हा नाचरा !
सीमोल्लंघन सान-थोर करण्या सायंतनीं सज्जले;
आशेचे नव वारु चौखुर जवें आस्वर्ग फुंफाटले !
आतां मंगलसंगमीं वसुमती स्वर्लोक आलिंगिल;
दिव्याचा नवलाख-साज निज ही अंगीं मुदें लेइल !
सीमोल्लंघन ! भोवतीं मज परी दुर्भेद्य हीं बंधनें !
आशा, भीति हृदीं सदैव करिती अस्तोदयी कंदनें !
नाहीं तीळ उसंत संतत जिवा हा घोर भारी पिळी;
देतां सादहि ये न, हांक मधु जैं ये दूर दिव्यांतली !
झालों आतुर फार मी, धरिं उरीं, येईं, अतां शारदे !
उल्लंघून जडास या, बळ मला दिव्यीं स्थिरायास दे !

# भिकारीण युवती *

जाति - चंद्रकांत

वक्षःस्थलिं कर कोमल दोन्ही धरी आपुले ती;
रूपसंपदा तिची वर्णितां शब्द सर्व थकती.
हळू हळू अनवाणी युवती भिकारीण येई,
वीरसिंह नृपतिच्या पुढें ती शांत उभी राही.
रम्य रेशमी झगा विराजे अंगि नृपालाच्या,
रत्नजडित शोभतो मस्तकीं मुकुट सुवर्णाचा.
देखुनि तिज तो सोडुनि सिंहासन खालीं येई,
स्वागत भेटुनि तिचें कराया समोरा जाई.
‘ अहो, नसें आश्चर्य मुळींही ! ’ वदती सरदार,
‘ निज सौंदर्यें अरुणकांतिला लाजवि ही फार. ’
‘ मेघांच्या जाळींत चंद्रमा विलसे गगनांत,
धूसरवस्त्रावृता शोभते तेविं ती नितांत.
कुणी प्रशंसी चरण तियेचे, कोणी तन्नयन,
कुणि काळा तत्केशपाश, अन् प्रेमळ सौजन्य.
रम्य रुचिरता अशी वदनिंची, दिव्य भाव असला,
अखिल भूतलीं कधीं कुणींही नाहीं देखियला.
‘ करोनि राजप्रतिज्ञा वदे वीरसिंह नृपती :–
‘ होइल अमुची प्रिय राणी ही भिकारीण युवती ! ’

* अल्फ्रेड लॉर्ड टेनिसच्या ‘ द बेगर मेड ’ या कवितेचें रूपांतर.

## विफल जीवन

जाति – भूपतिवैभव

ही गुलाब कलिका शोभे झुडुपावरती,
कीं बाळ बैसलें आईच्या कटिवरती;
आरक्त मनोहर सतेज खुलते कांति,
मधु गंध दरवळे विलोल वायूवरती.
‘ येईल माझिया समीप रमणी कोणी,
मृदु करांगुलींनीं घेइल झणिं मज खुडुनी,
खोवून रुचिर निज केशपाश सजवील.
कुणि रसिक वा मला वक्षःस्थलिं वाहील,
कुणि सदनिं उपासक सौंदर्याचा मजला
ठेवील नेउनी चित्रमंदिरीं अपुल्या.
कुणि भक्त प्रेमळ अनन्य भावें मातें,
आनंदें पूजिल, वाहुनि परमेशातें.
सज्जनास अथवा अर्पुनि मजला कोणी,
गौरवील त्याचे सद्‌गुणगण वानोनी.
निरखील निसर्गप्रेमी कविवर मजला,
अन् चढेल त्याच्या बहर स्फूर्तिलतेला.’

यापरी सुमनबालिका सुरम्य स्वप्नें
रंगवीत होती अनुदिन उल्हासानें.
‘ होईल मनोरथ पूर्ण माझिया मनिचे ! ’
पाजळीत होती हृदयिं दीप आशेचे.
उगवले चार दिन, तसेंच ते मावळले !
फुलराणी फांदीवरती कंपित डोले !

जाहलें तियेचें म्लन वदन करुणार्ह !
तों प्रवाह आला प्रबळ वायुचा, अहह ! !
विखुरल्या पाकळ्या सकल तिच्या भवतालीं !
निमिषांत हरपल्या पवनाच्या आंदोलीं !
स्वप्नसी वायुवर विरली जीवन-ज्योति !
स्वप्नेंहि तियेचीं विरलीं वायूवरती ! !

## घेईं प्रभो जन्म !

वृत्त – मंदारमाला

स्वातंत्र्य-यज्ञीं दिली जीविताचीं
जयांनीं मुदें आपुल्या आहुति;
स्वातंत्र्य लाभोनियां स्वर्गलोकीं
समाधान त्यांच्या न आत्म्याप्रति !
वर्षें सहस्रावधी जी अखंड
प्रिया हिंदभू जाहली खंडित;
आलोकुनी लोचनीं नीर लोटे
अवस्था सुदीना तिची सांप्रत !
आली मनीं कल्पना ना कुणाला –
कधीं हिंद होईल विच्छेदित !
" मातें करोनी प्रहारा वधावें !
रिघावें शरीरावरोनी मृत !

होईल तैं हिंदभूमी विदीर्णा !”
        महात्मा वदे वीर सत्यव्रत !
निर्धार लोपे परी अंतरींचा,
        महात्मामती जाहली मोहित !
सप्राण हातीं तयें हिंदभूची
        तनू छेदिली लोचनीं जागृत !
अन् मानिली धन्यता, राष्ट्र वैरी
        दुजें निर्मुनी यावनी शाश्वत !
अंकीं सुखें नांदले भूतकालीं
        इथें लोक जें हिंदभूमीचिया,
जे नांदती आज येथें, भविष्यीं
        पुढे सर्व येतील नांदावया,
त्यांची असे हिंदभू साच ! तीचे
        सदा सर्व आहेत ते मालक !
द्याया तिचा तोडुनि अंश नाहीं
        मुळीं हक्क कोणाप्रती घातक !
योगेश्वरा माधवा ! जाहली रे
        प्रिया हिंदभूमी तुझी खंडित !
घेईं प्रभो ! जन्म, तीतें कराया,
        पुन्हा सांधुनी, वैभवें मंडित !

८१३६८ काव्य
२१३४ २८।२।०४

# माझी प्रियतमा

वृत्त – शार्दूलविक्रीडित

नाहीं लेशहि माझिया प्रियतमा-नेत्रांत कांहीं तसें,
जेणें तीज कुरंगशावकदृशी कोणीं म्हणावें असें.
कांती ओष्ठयुगावरी दिसतसे रक्ता तिच्या, ती परी –
नाहीं तीज म्हणावयास पुरती बिंबधरा सुंदरी.
राही पीन पयोधरांवर तिच्या सर्वत्र नीला द्युति,
होई केविं तया सुवर्णगिरिशीं स्पर्धा कराया धृति ?
वाहीना शिरिं केशपाश विपुल भृंगाभ दृङ्मोहन,
भेदाया सजला सदा कुटिल जो श्यामात्म कामीमन,
रम्यारक्त गुलब लाल फुलले, मीं पाहिले पीतही,
राहीना फुलुनी कपोलफलकीं तीच्या परी एकही.
तीरीं सस्मित तन्मुखा निरखुनी, तेवीं सरोजा जलीं,
मूढा गंध-मधूस लुब्ध न चळे दोंवाजु भृंगावलि.
मोही कोकिलगीत सुस्वर जरी कर्णाप्रती कोमल,
होई मन्मन तद्गिरा परिसुनी प्रेमोर्मिमालाकुल.
नाहीं स्वर्युवती कधीं गजगती चक्षु:पथीं पातली;
माझी प्राणसखी परी सुचरिता संचारते भूतळीं.
वाटे साच तरीहि मत्प्रियतमा तैशी मला आगळी,
भासे, व्यर्थ तुळून, जेविं सुभगा ती सर्वथा वेगळी !

## रजनीस आवाहन

जाति - मुद्रिका

ये धावत, रजनी ! धीर धरूं मी किती ?
तुजवांचुनि शिणल्या जीवा विश्राम कुठें संप्रति ?॥ध्रु.॥

पूर्व-दिक्सागरांतुनी
सर्वही शिडें पसरुनी,
हाकारुनि तारूं झणीं,
ये, नांगर टाकीं क्षितिज-बंदरीं, सती !

उभवूनि तारकांकित
उत्तुंग गगनचुंबित
ध्वज तुझा विश्ववंदित,
दे द्वाही फिरवुनि विजयि दिगंताप्रति !

गिरि-दरी-काननावरी,
सरिदुदधि-तडगावरी,
निज छत्र शांतिचें धरीं !
दे पसरुनि मोहक तव जादू ख्यात ती !

रवि आला गगनोदरीं,
गे तेव्हांपासुनि तरी
हुरहूर तुझ्यास्तव उरीं !
ये, कुठंवर साहूं प्रखर दिनाची द्युति !

हा प्रकाश वासरगत
जरि इतरां करि हर्षित,
मजलागी परि जाचित !
लोचनें, बसुनिया झांपड, मंदावती !

जें दृश्य दाखवी दिन,
तें ज्ञान कुणा पावन;
अज्ञानतमाचे धन
परि अभ्यांतरिं मम विपुल तयें वाढती !

वाजार जगाचा दिसां,
भरतसे अश्रुंनीं पसा,
या क्षीण जाहल्या नसा,
हृदिं कोमलतेचे ओघ सर्व आरती !

अनुदिनीं निराशा, भय;
नच कधीं चुकांची गय;
हा निष्ठुर जगतीं नय !
ये ! अन्य माउली ! तुजविण नुरली गति !

मानापमान साहतां,
हतधैर्य खचें सर्वथा;
हा विदीर्ण हृत्पट अतां
या लोकीं तुजविण कोण इतर सांधिती ?

हा बाळ तुझ्यास्तव भुका,
व्याकुळून मारी हका !
अंधारसिंधु-नाविका
तव रुचिर तरंगीं झुलवीं, ज्योतिष्मति !

ती तुझी नित्य-नूतन
प्रीतिची झूल घालून
न्यूनता टाक झांकुन !
निज घेउनि अंकीं विकसित करिं मन्मति !

धरिं हृदयीं कुरवाळुनी,
प्रीतींत जीव न्हाणुनी,
शांत शांत मधु मोहनी,
दे अभिन्नतेची पसरुनियां भोवतीं !

अंगाइ गीत गाउनी,
चित्तास टाक भारुनी,
विस्मृतींत ने वाहुनी !
ये ! विटलों भारी सेवुनि ही जागृती !

## हा जादूगार कोण ?

वृत्त-शार्दूलविक्रीडित

केले सुंदर इंद्रचाप गगनीं निर्माण सप्तद्युति;
वज्राघात करोनि वारिदवपू भेदोनि नानाकृति,
वृष्टी अद्भुतरम्य कांचनमयी केली महीमंडलीं;
चूर्णद्रव्य-सुपूर्ण मुष्टि अनलीं रासायनी होमिली; –
ज्वाला चंड तयें प्रचंड उठुनी उत्तुंग चुंबी नभा,
विश्वा व्यापि अशेष निर्मळ तिची रम्या गुलाबी प्रभा;
शून्यांतून नभःपटा प्रकटवी, ज्याचेवरी संकुल –
नाना कोमल, मध्यमा, परुष हो वर्णच्छटा चंचल.
जादूचा असला मनोरम कुणीं हा खेळ आरंभिला ?
झाला स्तंभित भूमिगोल अवघा देखोनि याची कला !
व्योमीं छन्नशरीर काय बनुनी दावीतसे आपुले
जादूचे असले प्रयोग रवि हा तेजःप्रकर्षामुळें ?
मायेच्या अथवा, अनंत पटलीं होवोनि अंतर्हित
मायाधीश तमःप्रकाशजनिता जादू जगीं निर्मित ?

## गुलाबिनीचें फूल

जाति – भूपतिवैभव

हें एकच सरत्या वसंतकाळांतील
मधु फुलुनी राही गुलाबिनीचें फूल.
ते बरोबरीचे सकलहि मित्र तयाचे
मातीत सुकोनी गळले सत्प्रीतीचे !
सौख्यांत तयाच्या संगें हांसायला,
दुःखांत गाळुनी अश्रु स्फुंदायाला,
एकही न कोणी जवळ तयाला आप्त,
एकही न कोमल कलिका राही येथं !

हे उदास सुमना ! ठेविन मी नच तुजसी
या झुडपावरती अक्षय रे झुरण्यासी !
सुंदरता झाली निद्रावश सगळी ही !
तत्संगें जाईं तूंही, निद्रा घेईं !
तव उद्यानींचे संवगडि येथं समस्त
गंधहीन पडले चिरनिद्रा सेवीत !
या शय्येवरि बघ वात्सल्यानें करुण
पाकळ्या मृदुल तव देतों मी पसरून !

विसरतील मैत्री मित्र सकलही जेव्हां,
प्रीतीच्या हारांतील गळुनियां जेव्हां,
मम रत्नें सुरुचिर पडतिल रे सगळींही,
तैं असाच सत्वर येइन मागुन मीही !
सत्प्रेमपूर्ण जैं जातीं हृदयें सुकुनी,
वात्सल्यपूर्ण कालवायु नेई हरुनी,
हा ! भयाण ऐशा प्रखर शीत जगताच्या
इच्छील कोण मग ओसाडींत वसाया !

## अन्धत्वयाचना

वृत्त – शार्दूलविक्रीडित

दैवा ! अन्धपणा कधींतरि जरी मातें तुवां अर्पिला,
फेडूं तो उपकार मी तव कसा ना हें कळें बा मला !
तेव्हां ही जरि अंतरेल मजसी सृष्टी सुचेतोहरी,
दृष्टी दिव्य नवी चिरंतन सुधास्यंदी अहा ! अंतरी ! !
ठेवोनी हिमबिंदुच्या सुधवला मुक्ता फुलांच्या शिरीं
देतां तैं अमरेश नंदगनता गुच्छास माझ्या करीं,
साभिप्राय हंसून मी अधरता त्याची पहा, दाविन !
स्वोद्यानांतिल, तोषवीन, कलिका त्या केवला अर्पुन !
दैवा ! मन्मनिं पूर्ण पूर्ण ठसलें, केवीं कधींही जरी
नाहीं ती फिटणें तुझी उपकृती ऐशी, तुला बा परी
आतां निश्चित सांगतों, ' न सुम तें, त्याचीं तरी पाकळी ',
या न्यायें उतराइ होईन, जरी मद्दृष्टि हो आंधळी !
कल्पांतावधि त्वच्छिरीं धरिन भी धाराच ती संतत –
पुष्पांची, अलि गीत गातिल जया मंदारनिंदायुत ! !

## हासतसे संध्याराणी

चाल – ओवी

हासतसे संध्याराणी
गोड गालीं आनंदांत, बाई आनंदांत !
पसरली मोतीयाची प्रभा गगनांत.

कुरवाळी हृदयाशीं
चुंबुनीया चंद्रकोर ! बाई चंद्रकोर !
प्रेमसागरींचा तिच्या ओसंडला पूर !

सभोवतीं गोळा झाला
तारकांचा बाळमेळा, बाई बाळमेळा;
खुणावीतो खेळायाला कटीच्या वेल्हाळा.

उतरली चंद्रकला
तारकांशीं खेळायाला, बाई खेळायाला;
धरीयला फेर नभीं, मोही मानसाला.

नाचूनीयां बाळें सारीं
श्रमलीं ग अनिवार, बाई अनिवार;
ओघळलें दहिंवर खालीं तरूंवर.

खेळ झाला तारकांचा !
गेल्या साऱ्या घरोघर, बाई घरोघर;
चंद्रकोर माउलीच्या हासे मांडीवर.

किर्रतात दूर रानीं
रातकिडे अंधारांत, बाई अंधारांत;
झोपीं गेलीं चंद्रकोर आईच्या कुशींत.

झोपी गेले काऊ चिऊ,
झोपी गेलीं रानफुलें, बाई रानफुलें !
हालवितो हळू हळू वारा त्यांचे झोले !

शांत झालें अंतराळ !
शांत झाली वनराई, बाई वनराई !
जागू नको सोनुल्या रे ! झोपीं आतां जाई !

# फुलपांखरास

जाति – अंजनी

निरुंद वळचण छपराखालीं,
ठायिं अल्पशा या लावियली
फुलझाडें, अन् अशी चिमुकली
बाग कुणीं केली.

कृत्रिम ऐशा लघु उद्यानीं
रमसी पाहुनि अन्तःकरणीं
खेदोर्मी मम येती उसळुनि,
फूलपांखरा रे !

सहजपणाच्या सुंदरतेला
कृत्रिमतेनें आहे मुकला
सान बगीचा हा बा सगळा
का न गमे तुजला ?

सुंदर पुष्पें येथें फुलतीं,
शुभ्र हास्य निज मुखीं खुलवितीं
लोकरंजना करण्या झटतीं
डोलडोलुनीयां.

परि सकलांना कृत्रिमतेची
जडली आहे बाधा अशुचि,
कोमल सुषमा तद्वदनींची
मावळली म्हणुनी !

स्वैरविहारी सखया ! तुजला
कृत्रिमतेच्या बंधनांतला
कृपण समागम कैसा रुचला ?
सांग तरी मातें !

वनीं विहरसी स्वच्छंदानें,
तरलित रमसी मृदु पंखानें,
लाख फुलांच्या हृदाराधनें
जीव तुझा बेजार् !

परिमलपूरित लहरीवरतीं
आंदोलसि तूं लतिकांवरतीं !
तरुपर्णांच्या माजीं लपतीं
शोधिसि तीं सुमनें !

सुमसृष्टीच्या लडिवाळा ! तूं
सौंदर्याचा कीं बिसतंतु,
उल्हासाचा निधी ! परंतु
मोहमूढ रे आज् !

नको फसूं या मोहबंधनीं;
स्वैरवृत्ति तव जाइल सुकुनी !
फिर परता जा ! तुज पालवुनी
बाही वनदेवी !

प्रत्यय घेऊं नको विषाचा !
गात बैसशिल रड जन्माचा –
अम्हांपरी ! मग मोक्ष कशाचा !
मोह नको पावूं !

## एकनिष्ठ कुमार

जाति – दिंडी

मिसिज् हेमन्‌ज् या कवयित्रीच्या 'काझाबिआंका' या कवितेचें हें रूपांतर आहे. इ. स. १७९८ मध्यें इंग्रज व फ्रेंच यांच्यांत झालेल्या आरमारी लढाइत फ्रेंच आरमारांतील 'ऑरिअन्ट' या युद्धनौकेच्या सेनापतीनें 'काझाबिआंका' नांवाच्या तेरा वर्षाच्या आपल्या मुलाला जहाजावर एका ठिकाणीं उभें राहावयास सांगितलें होतें, व 'मीं सांगितल्यावांचून तेथून हलूं नकोस!' असें त्यास बजावलें होतें. लढाई चालू असतां त्याचा पिता मृत होऊन पडला! शेवटीं जहाजाला आग लागली व तें तोफेच्या गोळ्यानें उडवून देण्यांत आलें. आपला पिता मरून पडला आहे हें मुलाला समजलें नाहीं. त्यानें शेवटपर्यंत तेथेंच उभें राहून मरण पत्करलें. हा प्रसंग या कवितेंत वर्णन केला आहे.

उभा पृष्ठावर पेटल्या कुमार,
सकल भीतीनें जाहले पसार;
आग होती नौकेस लागलेली,
महा ज्वाला उसळल्या भोंवतालीं.

समर-नौका परिभग्न असे झाली,
पृष्ठभागीं प्रेतेंहि विखुरलेलीं;
तयांमाजी एकला उभा बाळ,
वरीं ज्वाला त्या विहरती कराल.

रुचिर सुंदर तेजाळ बाळ साजे,
वादळाचा कीं अधिपती विराजे;
रक्त शूराचें सळसळें शरीरीं,
स्वाभिमानी, जरि बालरूपधारी.

पुढें आल्या खवळून महाज्वाला —
नसे पित्राज्ञा परी जावयाला;
म्हणुनि तेथुनि हालला मुळीं नाहीं,
बाळ निश्चळ राहिला त्याच ठायीं.

पिता मूर्च्छित जाहलासे तळाशीं,
पाश मृत्यूचे जखडिती तयासी;
बाळ वाही त्याजला मधुर वाचें,
क्षम न ऐकाया शब्द तो मुलाचे.

"कार्य माझें संपलें काय, तात?"
बाहि त्यातें तो उंच सुस्वरांत;
तया नाहीं उमगलें कीं मुलाचें
भान कप्ताना राहिलें न साचे.

पुन्हां गर्जुनि तो वदे, "तात, बोला!
अतां येथुनि जायचें काय मजला?"
परी आल्या उत्तरा घुमत गोळ्या,
आणि वेगें लोटल्या पुढें ज्वाळा.

झळा झोंबूं लागल्या ललाटाला,
आणि उडत्या केसांत रमायाला;
स्थान होतें मृत्युचें तें भयाण,
आणि नैराश्यें पाहि तो तिथून.

शांत होती जरि निराशा तयाची,
तरी होती ती साच शूरतेची.
पुन्हां गर्जुनि तो एकदांच वाही,
"तात, मजला राहणें प्राप्त काई?"

तोंच शीडा-दोरखंडामधून
आग वेगें चौफेर ये वरून;
उग्र तेजानें वेढियली नौका,
आग भिडली झेंड्यास उंच देखा.

शूर बाळाच्या शिरीं फडकतात
महा ज्वाला ध्वजसभा अंबरांत.
आणि भीषण मग गडगडाट झाला --
बाळ—गेला तो केविं कुठें, बोला?

वृत्त आतां पवनास हें विचारा,
तयावांचुनि कोणी न सांगणारा;
तयें विखुरुनि विच्छेद दिले दूर
पृष्ठभागीं जलधिच्या सभोंवार —

डोलकाठी, ध्वज रम्य, नी सुकाण,
यांहि केलें निज कार्य फार छान; —
श्रेष्ठतम जी हरपली तेथं वस्तू,
गमे निष्ठावान् बाल तो परंतु !

ग्रंथ संग्रहालय ठाणे ग्र. क्र. 98142 शाखा (स्थळ प्रत)

## गुढ्या !

**वृत्त - शार्दूलविक्रीडित**

वर्षारंभ नवीन ! भास्करसखा चित्रागृहीं रंगला !
मेघश्याम घरा त्यजून वसनां सेवी मुदें मंगलां;
कुंजीं कोमल कूजितें, खगतती आनंदुनी सुस्वरा,
वाही स्वागत हें सुधामधुरवें आगामिसंवत्सरा !
मोदें पाहुनियां कुठें प्रियमुखा लाजे नवी नोवरी;
कोणी प्रीतिफळा स्वकीय रमणी चुंबी स्वबाहूवरी.
आशेच्या शिखरीं समुत्सुक अजी आरूढ सारें जग !
ऐशा उंच तदीय का नच गुढ्या व्योमीं चढाव्या मग ?
चित्ताच्या मम नंदनास अवघ्या ही आग लागे परी !
आशेचा भडका उडून मिरवे ज्वाला-गुढी अंबरीं;
गेल्या मोहरल्या जळून अखिला त्या भावना कोमल,
सौंदर्यें हृदयांतलीं करपलीं, तेवीं सुधा प्रेमल !
सारी हाय ! भयाणता पसरली आहे स्मशानी मनीं !
अन् केव्हां चढते नभीं मम गुढी आतां स्मशानीं जनीं !!

## धावा

जाति – देवद्वार

गेली कोठें माय ? दिसेना ती हाय !
जिवा काय होय बाळाचीया !
पाहे भिरभिर जीव हो बेजार !
डोळां वाहे नीर घळघळा !
कोणीहि आपुले नाहीं राहियेले —
जगीं, ऐसें झालें बाळालागी !
काकुळती येई, बाही, ' आई ! आई ! '
दृष्टीसी न येई, तरी बाही !
तैसें माझ्या जिवा झालें, गा केशवा !
बाहीं तुझ्या नांवा घडीघडी !
येईं, गा विठ्ठला ! भारी आसावला
भेटाया तुजला जीव माझा !
लागे हुरहुर, वारीं हें काहूर !
येईं रमावर ! लवलाही.
तुजवीण मातें कोण, गा श्रीपते ?
लोटियलीं हातें सुखें सारीं !
येईं रे मुरारी ! धरीं मज उरीं !
चित्तीं लागे सुरी तुजवीण !
' हरि ! ' नांवें बाहे कोणी कोणा, पाहें !
वाटे, आला आहे चक्रपाणि !
बावरल्या चित्तें दाही दिशा तूंतें,
माधवा ! हेरिते वृथा दृष्टि !
पुरे ही वंचना आतां, नारायणा !
सुख तुझ्याविना नाहीं चित्ता.

येईं रे अनंता ! नको पाहूं अंता !
धीर नसे आतां जिवा माझ्या !
येईं कंसभंगा ! येईं रमारंगा !
येईं जिवलगा पांडुरंगा !
येईं गिरिधारी ! नेईं झडकरी
आपुलिया घरीं बालका या !

## अनुताप

जाति – आर्या

त्रिभुवनपावन गंगे ! तीर्थजलाची विशुद्ध तव धार –
मम वदनांत पडोनी अंतरिचा दाह शांतवू पार !
रघुकुलललाम रामा ! अतर्क्य महिमा त्वदीय नामाचा;
रसना रतली त्याशीं ! संहरिं अंधार गा मदंतरिंचा !
या या संतजनांनों ! ऋषीश्वरांनों ! त्वरा करा आतां !
बोधसुधा पाजा ती अपुली शरणागता मला पतिता !
जेथें परात्पराच्या स्थिरपदिं करितां सदा तुम्ही वास,
न्या तेथं हात धरुनी मातें ! ही एक हो असे आस !
अथवा, पुरें पुरें हें ! अशने ! करिं दारुण प्रहारातें !
चिरडीं शिर मम ! तनुचा एकहि कण गा न ठेविं बघण्यातें !
ये ये, वा वनराजा ! खरतरनखरीं विदार मम ऊर !
आकंठ पान करुनी, तहान निववीं, मदीय मधु रुधिर !
शांति खरी जीवाला लाधेलच, वा, असेंच उतरून
खड्गें स्वकरें जरि निज शिर मुग्धेच्या पदांस वाहीन !

## श्रीकृष्ण-स्तवन

जाति – साकी

जन्मि देवकी-हृदयीं ज्याच्या पारावार न उरला –
आनंदाला, वसुदेवाच्या नयनयुगाला आला –
पूर अश्रुंचा, कारा निवसन जावोनी विलयाला,
निगड तुटोनी, बंधमुक्तता क्षणिं अनुभविता झाला.
महा खलजनां शासियलें बहु सामर्थ्यें निमिषांत,
सज्जनवृंदा अर्पियलें सुख हरुनी भीति समस्त,
तयास खलजन भयाकारणें प्रेमें नेई तात –
गोकुलामधीं ऐन रात्रिच्या समयीं पर्जन्यांत.
तिथें बालपणिं नंदमंदिरीं गाई अनुदिनिं वळिल्या,
म्हणुनि सुरस 'गोपाल' नांव जन तकल वाहती ज्याला.
यमुनेच्या जलिं वसे कालिया विषधर खरतर फार,
हालहाल निज पसरुनि जाळी वनविषया अनिवार;
तयास निवटुनि अखिल सुखविलें गोकुलवासि जनांला,
ध्यान निरंतर रुचिर अर्पुनी भजनप्रिय भक्तांला.
धेनु आपुल्या यमुनातीरीं प्रेमें राखित असतां,
बृन्द वांधुनी त्यांहि रहावें एक्या ठायीं चरतां,
ओष्ठयुगलिं निज वेणु म्हणोनी ऐटदारसी धरुनी
हृदयें त्यांचीं तिहीं हरियलीं मधुर नाद काढूनी;
'मुरलीधर' बहु नांव गाजलें जगिं ज्याचें म्हणुनी,
ज्यास विलोकुनि सुजन अचलपद पावति दुरित शमोनी.
भाकर-काला संवगडियांचा सकल कारोनी एक,
मोदें त्यांसह भोजन करि वनिं मनमोहन निःशंक;
जयापुढें, ती असुरनिकर खर समरीं रगडुनि वरवा
सुधा लाधली, फिकी वाटली सेवायाला देवां !

भोजन होतां येतिल अपुले हात धुवाया सकल,
कर-रज त्यांचें जलामधें जें गळोनियां पडतील,
सेवन करुं तें, म्हणूनि मोठ्या उत्सुकतेनें मिळुनी
त्वरित पातले यमुनेच्या जलिं अमर मीन होवोनी.
व्यास, वाल्मीकि, ऋषिगण, वासव, विरींचि, शंकर धीर,
अफाट अतिगंभीर शोधितां यद्‌गुणपारावार,
" नेति नेति " बहुवार वाहुनी वाणी सहजा साची,
" शिणलों आम्ही ! " सुचविति " कुंठित मती जाहली अमुची ! "
स्वजनांसंगें समर कराया धजे न करुणापूर्ण,
प्रिय सखयाला बोधसुधा निज पाजुनियां परिपूर्ण,
इन्धनसम अज्ञान जाळुनी तदीय अभ्यंतरिंचें
उजळुनि दिधलें विहित पुण्यपथ इह-पर-कर्तव्याचे.
एकांशानें स्थिरचर अखिला भूषविसी सृष्टीसी,
मुनिजन-मानस-गगन-मंडलीं रविमंडलसा वससी.
आदि-मध्य तुज अंत असेना, पूर्णाहुनि परिपूर्णा !
भक्तजनांच्या प्रीतीस्तव तरि सगुणरूप घेसी ना ?
सजल-जलद-कमनीय कोमला श्यामल तव तनुकांति,
चार भुजांनीं साच वाटतें होय तिची परिपूर्ति.
विकचकमल कर एक विभूषी, चक्र सुदर्शन दुसरा,
धवल तिजा पांचजन्य, कौमोदकी चतुर्थचि रुचिरा.
वनसुमनांची सुरुचिर माला शोभविते कंठाला,
रत्नमण्यांचा कनकमुकुट शिरिं खुलवितसे वदनाला.
विलसत राही पीतांबर मनमोहन दिव्य कटीला,
कोटि सुमनशर ओवाळाया थोडे तव रूपाला !
खलजन संहारुनी रक्षिसी प्रियजन अपुले, सदया !
निजधामाला नेसि क्षणीं भवभय यांचें हरुनीयां.

चरणयुगाला प्रथम वंदुनी आलिंगूनि तनूला,
सौंदर्यी तव मुखकमलाच्या विहरुं देइं मम मतिला.
अनन्य भावें शरण तुला मी आलों, यदुकुलराया !
निज पदकमलीं सत्वर नेईं प्रणत पतित दासा या.

## प्रशांत रजनी

वृत्त–शार्दूलविक्रीडित

आनंदें रजनीचिया पहुडतो अंकावरीं चंद्रमा;
त्याची हास्य-सुधा प्रशांत रुचिरा विश्वांत हेलावते;
स्वादु स्निग्ध गभिर, सृष्टि अखिला, निस्तब्धता न्हाणिते;
शांती निःस्वन सारखी विलसते चौफेर चेतोरमा !
लोपे ती क्षणमात्र, जैं तरुशिरीं पर्णां करी नादित
येवोनी मृदु मंद वायुलहरी कोठून आकस्मिक;
किंवा किल्बिलतो विहंग विटपीं होऊन पर्युत्सुक;
वा कोणी सहसा शकुंत सरतो वेगें नभीं पोहत.
हा ! दुर्दैव मदीय ! यंत्र-गृहसें झालें मदभ्यंतर !
चक्रें प्राकृत हीं परस्पर सदा संलग्न शब्दादिक
चक्राकार परिभ्रमून गिरक्या देतीं जिवा त्यांवर;
शांती लेश न, खिन्नता भ्रमणिं ये त्या-त्याच की भौतिक !
दिव्या शांति अशी मिळो मज समुत्कंठा किती लागली !
दिव्याच्या पथिं आडवी पसरली दुर्लंघ्य ही देहली !!

## व्याकुलता

वृत्त-शार्दूलविक्रीडित

केलीं आजवरी जगीं सतत जीं कार्यें तयां ना मिति;
        कोणा आवडलीं तयें वहुत तीं अत्यादरें बानिलीं,
        कोणा नावडलीं अहर्निश तयें रोषें बहू निंदिलीं.
ऐकोनी स्तुति लोचनीं चमकली केव्हां प्रमोद-द्युति;
निंदा-शल्य सलून अंतरिं कधीं झाली विषण्णा मति.
        जेवीं वाहिल वायु, पाठ सहजीं तेवीं तयाला दिली;
        पाणी वाहिल त्यासवेंच सहसा नौका सदा लोटली.
नाहीं लेशहि मानसास शिवली छंदीपणाची क्षिती !
वाटे नीरस सर्वथा मज अतां स्वच्छंद हें जीवन;
        कार्यांची भयदा विसंगति सदा चित्ता करी विव्हल.
हेतूचें विविधांतलें न उमगें तें गूढ संवेदन,
        जेणें विश्व समग्र एक कलिका डोलें मुदें मंगल !
ऐक्याची समजेल काय अतुला दिव्या मला ही कला,
जीवाची निववील आग भलती वर्षून दिव्या जला ?

## श्रीमद्भगवद्गीता—अध्याय बारावा

जाति – चद्रकांत

### भक्तियोग

पार्थ म्हणे, " यापरी तुम्हांला परमभक्त कोणी
योगयुक्त होउनी सतत जे भजति, चक्रपाणी !
आणि जे कुणी ज्ञानी अक्षर अव्यक्ता भजती,
दोहोंतिल या उत्तम योगी कोण, वदा, असती ?"

वदे तया जगदीश, "होउनी नित्य योगयुक्त,
मनोभाव अर्पुनी माझिया ठायीं, मद्भक्त —
उपासना जे करिती माझी श्रद्धेनें परम,
पांडुनंदना ! मानितसें मी तयांस युक्ततम.
सर्वव्यापी, अचिन्त्य, अक्षर, अनिर्देश्य, अचल,
कूटस्थ, ध्रुव, अव्यक्तहि जे उपासिती विमल,
सकल इंद्रियां आटोपुनि निज हृदयीं धैर्यानें,
बघति सदा सर्वत्र जगीं जे समत्वबुद्धीनें,
सकल भूतमात्राच्या प्रेमें हितार्थ जे झटती,
लाभ मदीयचि तयां होतसे, कौंतेया ! अंतीं.
अव्यक्तीं जे सजति कराया स्थिर निज चित्ताला,
प्राप्त होतसें क्लेश अधिकतर साहणें तयांला;
कराण मानव रूपगुणांनीं व्यक्त देहधारी,
वाट तयाला अव्यक्ताची कष्टाची भारी.
परी अर्जुना ! कर्में मजला समर्पुनी सकल,
मलाच परम श्रेष्ठ मानुनी भुवनत्रयिं अखिल,
स्वरूप माझें हृदयिं निरंतर धरुनि मला ध्याती,
अनन्ययोगें परम भक्तिनें जे मजला भजती,
तयांस मी, भवसागरांतुनी पार करायाला —
जन्ममृत्युमय, लावित नाहीं पळहि विलंबाला.
चित्तवृत्ति संपूर्ण अर्पिती जे माझ्या ठायीं,
चिंता त्यांची म्हणुनि वाहणें प्राप्त मला होई.
मद्रूपाच्या ठायीं म्हणुनी दृढ निर्धारानें
वृत्ति मनाच्या ठेवीं, बुद्धिहि तेवीं प्रेमानें;
यापरि दोन्ही सवेंच रमतिल जर मद्रूपांत,
होशिल मजशीं एकरूप, नच संशय मुळिं यांत.

धनंजया ! परि सुस्थिर करणें शक्य न होइ तुला
मद्रूपाच्या ठायीं सत्वर जरि निज चित्ताला,
योगाभ्यासा तत्परतेनें अविरत आचरुनी
पदास माझ्या पावायाची इच्छा ठेवि मनीं,
समर्थ होसि न करावयाला जरि अभ्यासातें,
प्राप्तीस्तव मम शास्त्रविहित करिं सर्वहि कर्मातें;
माझ्या ठायीं समर्पुनी जरि कर्में आचरिसी,
पावशील सायुज्य–मुक्तिच्या शाश्वत सदनासी.
परी हेहि तुजलागी करणें शक्य न होइ जरी,
कर्मयोग-सेवनीं मनीषा हृदयामाजि धरीं;––
करुनी इंद्रिय-निग्रह, चित्ता धैर्यें आवरुनी,
कर्मफलातें त्यजीं सर्व मग निस्पृह होऊनी.
आहे श्रेयस्कर अभ्यासाहुनी ज्ञानयोग,
ज्ञानाहूनी उत्कृष्ट असे उपासनायोग,
उपासनेहुनि कर्मफलांचा श्रेष्ठ असे त्याग,
त्यागानें लाभतो तत्क्षणीं शांतीचा भोग.

सुखदु:खीं समभाव, अंतरीं सागर करुणेचा,
निर्मम, निरहंकारी, न करी द्वेषही कुणाचा,
क्षमाशीलता वसुंधरेच्या तोलाची ऐशी,
मैत्री ज्याची एकरूप सर्वभूतमात्राशीं,
निजाधीन निर्धारें ठेवी नियमुनि चित्ताला,
संतुष्ट सदा, योगी, राखी दृढ निश्चय अपुला,
करी सपर्पण माझ्या ठायीं जो मन-बुद्धीतें,
ऐसा माझा भक्त होतसे परम प्रिय मातें.

लोकांना वाटे न कधींही कंटाळा ज्याचा,
जयांस वाटे ना कंटाळा मुळींहि लोकांचा,
क्रोध-हर्ष-भय-चिंतेपासुनि जो होई मुक्त,
ऐसा होई मजला परम प्रिय माझा भक्त.
काया-वाचा-मनें सर्वदा शुचिर्भूत राही,
वासनेस अंतरीं न देई थारा केव्हांही,
कार्यीं राही दक्ष, फलास्तव उदासीन सतत,
विकार ना कोणते जयाचें चाळविती चित्त,
सकाम कर्मांचा जो अवघ्या करी परित्याग,
ऐसा माझा भक्त होतसे प्रिय मजला सुभग.
हर्ष न होई चित्तीं ज्याच्या इष्ट लाभ होतां,
अंतरिं नुपजे द्वेषभाव जैं अनिष्ट ये हाता,
जीवनांतल्या गत गोष्टींच्या करी न शोकातें,
सुखभोगाच्या निज हृदयीं ना धरि आकांक्षेतें,
कर्मांच्या शुभ-अशुभ फलांचा करी परित्याग,
ऐसा माझा भक्त होतसे प्रिय मजला सुभग.
शत्रू आणी मित्र वाटती सारखे जयाला,
ठेवी मानापमानिं अपुल्या समान चित्ताला,
शीत-उष्ण-सुख-दुःखा भोगी समान भावानें,
विषयलालसा सोडुनि राही नित्य विरक्तीनें,
निंदास्तुतिला समान मानी, नियमी वाचेस,
मिळे सहज जें तयांत मानी सदैव संतोष,
कर्मफलांची धरि न मनीषा, नित्य शांतचित्त,
ऐसा होई मजला परम प्रिय माझा भक्त.

यापरि केला कथन धर्म हा अमृतोपम तूतें;
मानुनि परम श्रेष्ठ मला जे आचरिती यातें,
श्रद्धापूर्वक अनन्यभावें भक्तियुक्त चित्तें,
ऐसे माझे भक्त अतीव प्रिय होती मातें. "

## भगवद्गीता–अध्याय पंधरावा

जाति – चंद्रकांत

### पुरुषोत्तमयोग

प्रचंड शाखा येउनि खालीं व्यापिति विश्वाला;
वरतीं वरतीं जाउनि भिडलें मूळ अनन्ताला;
रुचिर विराजे दाट पालवी वेदांची भवतीं;
जन म्हणती अश्वत्थ जयाला अव्यय या जगतीं;
त्या वृक्षाचें जयास झालें संपूर्ण ज्ञान,
वेदशास्त्रसंपन्न तयाला म्हणती सज्ञान.
त्रिगुणांचें खत सतत सेजितीं मूळें अवघीं तीं
म्हणुनि वाढल्या पोसुनि शाखा खालीं नी वरतीं.
अंकुर शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधाचे फुटले;
पसरत आलीं मानव लोकीं कर्माचीं मूळें.

रूप तयाचें परंतु येथें आढळे न ऐसें;
आदि या नसे, अन्त न गवसे, स्थिति यासी न दिसे.
खोल खोल अनिवार पसरलीं दृढ मूळें याचीं !
दिव्य शक्तिची समशेर करीं धरिं वैराग्याची,
घाव घालुनी कठोर आधीं शौर्यानें निमिषीं,

छेदुनि टाकीं, वीरनायका ! या अश्वत्थासी.
तदनंतर, जाऊनि जेथं ये फिरुनी न माघारें,
दिव्य धाम तें शोधायाला तयार होईं रे !
'सृष्टि पुरातन ही उद्भवली सारि जयांतून,
आद्य पुरुष तो मीच !' भाव हा मनिं वे फुलवून !
अहंभावना विलया गेली, आसक्ती सरली,
काम्य कल्पना नुरली, वृत्ति स्वरूपांत मुरली,
गळून गेले सुखदु:खादिक द्वन्द्वांचे पाश,
मोहरात्र लोपली, तयाला स्थिरपदिं त्या वास !
अग्नि, चंद्र, सूर्यही न पुरवी प्रकाश त्या ठाया !
परपद मम तें, परत न फिरती जेथें नाउनियां.

जीवलोकिं या जीवरूप जो होवोनी राही,
अंश सनातन मदीयची तो नित्य असे, पाही.
प्रकृतिगत सहा सूक्ष्म इंद्रियें मनासवें साच
आकर्षुनि, सूक्ष्म देह वरितो, स्थूल देहिं तोच.
जड देहाचा आश्रय करि, वा सोडुनि त्या जाई,
पुष्पसुगंधा पुष्पामधुनी पवन हरुनि नेई,
तेविं आपुल्या संगें तेव्हां ईश्वर त्यांतून
सकल हीं सहा सूक्ष्म इंद्रियें नेई वाहून.
श्रवणीं, नयनीं, त्वचेंत, नाकीं, जिव्हेच्या ठायीं,
बसुनि सेवि हा, मनांत तेवीं, विषयां सकलांही.
स्थूल देहिं राहतो तोच, वा पडतो वाहेर,
त्रिगुणसंग पावून भोगतो तोच भोगभार.

मोहमूढ मानवास याची जाणिव ना होई;
ज्ञानदृष्टि लाधली तयाला भूल पडेना ही.
विरक्तवृत्ती अंगिं बाणली पूर्णपणें ज्याच्या,
यत्नशील तो योगी पाही त्यातें हृदिं अपुल्या.
हृदयीं विद्युल्लता-वासना घाली थैमान,
दिसे न तो मानवा विमूढा त्या करुनी यत्न.

अखिल जगाला करी प्रकाशित रविचें जें तेज,
चंद्राची चंद्रिका धवल जी मनोहरा सहज,
सर्वभक्षि जी लाल धगधगे अग्नीची आग :
तेज सकल माझेंच असें तें जाण अंशभाग.
भूगर्भामधिं शिरुनि करितसें अपुल्या तेजानें
मीच भूतमात्राचें धारण पोषण नेमानें.
रसस्वरूपी धरूनियां त्या रूपहि चंद्राचें,
मीच करितसें पोषण येथिल अखिल ओषधींचें.
जठरांतिल तो अग्नि जयाला वैश्वानर वदती,
मीच असें प्राण्यांच्या देहीं करूनियां वसती.
अपान आणी प्राण वायुचा आश्रय घेऊन,
मीच पचवितों सकल चतुर्विध उदरींचें अन्न.
सर्वांच्या हृत्सिंहासनिं मी सुविराजें राणा,
स्मृति, ज्ञान, विस्मृती मजमुळें लाभतसे त्यांना.
जया शोधितां सकल वेदही थकले ते सुज्ञ,
मीच असे तो, वेदान्ताचा कर्ता वेदज्ञ.

दोन पुरुष हे जगन्मंडळीं या असती जाण;
'क्षर' वदती एकास दुजाला 'अक्षर' अभिधान.

नामरूप हें नश्वर सारें ' क्षर ' वदती त्यातें;
जाउनि विलया नामरूप, तें ' अक्षर ' मग उरतें.
उत्तम पूरुष परी यांहुनी असे निराळाच;
सार्थ नांव देतात तयाला ' परमात्मा ' हेंच.
जगत्‌त्रयामधिं तोच सकल या भरूनि उरलासे;
अव्यय ईश्वर तोच नित्यही त्यातें पोषितसे.
निवास माझा ' क्षर ' पुरुषाच्या पलीकडे साच;
' अक्षर ' पुरुषाहूनहि उत्तम मी तर आहेंच;
जगामधें या म्हणुनि सकलही वेदामधिं तैसें
नांव गाजतें आहें माझें ' पुरुषोत्तम ' ऐसें !

संमोहाच्या मदिरेचा मद अशेष उतरूनी,
' पुरुषोत्तम ' मी म्हणुनि मला जो जाणितसे कोणी,
होउनियां सर्वज्ञच माझा भक्त प्रेमळ तो,
अनन्य भावें मला, भारता ! प्रेमानें भजतो.
गुह्यांतिल हें शास्त्र गुह्यतम समज, पुण्यशीला !
केलें आहें कथन आज मीं, कौन्तेया ! तुजला.
अवगत होइल कुणा मानवा हें विमल ज्ञान,
बुद्धिमंत तो होइल जगतीं, कृतकृत्यहि जाण.

# आई ! आम्हांला सोडून जातेस !

जाति – उद्धव

दिवस चार झाले आज, नच शब्दहि बोले आई !
तोंडात दुधाचा घोट घालितांहि घेतच नाहीं !
पडुनि राहि अंथरुणांत, वाताचे झटके देहीं !
हा पुनरपि झटका आला !
उघडतां नेत्र-वदनाला,
कंप भरे सकलांगाला !
तापली तनू आईची ! हाय ! कशी गति दैवाची !

हे हाल असे तव आई ! नाहीं मज बघवत आतां !
करुं काय ? जिवाचें आंत काय होइ नच ये वदतां !
सुकल्याच मातिचा, देवा ! किति अंत तरी हा बघतां !
स्वर्गींतिल प्रेमळ गंगा
आटली असे का, सांगा ?
हवि काय तुम्हांस अभंगा —
प्रेमाची पावन सरिता ? आईस म्हणोनी नेता !

अंतरणार तुला आम्ही हाय ! अतां कायम, आई !
हा विचार हृदयीं उठतां देहाची होई लाही !
निरवून कुणा आम्हांस जाशील सांग लवलाही !
— ‘ प्रभु पिता अनाथा जगतीं !
घेऊन दयाघन हातीं,
रक्षील लेकरां पुढतीं. ’
समजूत घालुनी आम्हां का टाकुनि जाशी, आई ?

ऐकेल देव तव हांक, संदेह मुळीं नच यांत !
तें अगाध कितिही त्याचें जरि असले प्रेम जगांत,
तरि थिटेंच गे प्रेमाचें पांघरूण त्याचें गमत !
तव हात शुद्ध प्रेमाचा
जरि वदनीं न फिरायाचा,
स्वर्भोग फिका तरि अमुचा !
मग अम्हां लाविशिल, आई ! कोणाच्या अंगीं, बाई ?

हें तुझे किती गळतात घळघळा थेंब अश्रूंचे !
ह्या अथांग तुझिया प्रेमा उतराइ कसें व्हायाचें ?
कुरवाळ एकदां आम्हां हृदयाशीं तव शेवटचें !
नयनांतिल प्रेमळ पाणी,
प्रेमाची तव बोळवणी
मार्ग हाच गे निर्वाणीं
दैवानें जगतीं ठेला ! यावांचुनि अन्य न उरला !

## संध्याकालीन वसंतवायूस

जाति – 'मनमोहन' सारखी

ये मंद मंद तू वसंतवायो ! भरुनि टाकीं भूमिगोल्. ॥ध्रु.॥
शांत संध्या धवलवसना
अरुणकांती स्मेरवदना
हे तुजवरि उधळी पराग गगनीं रुचिर सोनेरी विलोल् !

वृक्षराजी मुदित डोले
भाव करुनी प्रकट अपुले;
घे चुंबन, भार श्रवण तियेचे प्रणय-गूजें कथुनि खोल्.

प्राणप्यारा वसंताचा
मित्र कोकिल होय साचा;
तुज बाहि आम्रतरु-शिरीं, परिस हे स्वागताचे सुरस बोल्.

राष्ट्रभक्तोमाजि दिधली
जयें स्वार्थाहुती अपुली,
ये दास्यविमोचन-मंत्र आपुला तया सांगाया अमोल्.

दयित-विरहें हीनदीना
मुग्धमधुरा हरिण-नयना;
सांगून प्रेमसंदेश वदंगीं टाक भरुनी पुलकजाल्.

भवीं नाहीं धीर आतां,
शरण जाई दीननाथा;
भवतारक करुणासिंधु दाखवीं भक्तराया नंदलाल्.

चारुतेचा कुणि भुकेला
दिव्यभावें जीव नटला;
सौंदर्यसरीं निज मंदलहरीच्या तन्मनाला देइं झोल्.

पाश जडतेचा निमाला,
जीव अमृतामाजि विरला;
निःश्वासें आनंदैकधाम त्या महात्म्याला त्वरित खोल्.

इष्ट जगतीं जें जयाला,
तोच दे संदेश त्याला;
निज लहरी-लहरीवरीं बोलवीं विविध हृदयींचे सुबोल्.

काय परि संदेश निज तूं
देसि नुमजे मज, परंतु --
हे भाव अंतरीं अतर्क्य भरले मधुस्पर्शें तव सलील्.

बाळ आई घेइ अंकीं,
स्नेहदृष्टीं वदन निरखी,
कीं कुरवाळुनि हळु घेइ चुंबनें अमित, वाही मृदुल बोल्.

देहभावा देह मुकला,
जीव वीचीवरति विरला,
अन् दान-भोगही खेळ निमाला अंतरींचा वघ समूळ् !

मंजु मंजू येइ अजुनी
आळवूं मी केविं म्हणुनी;
तरि येइ तुझिया मधु हिंदोलीं जीव झुलवाया खुशाल्.

वीचि-वीणेवरति गाईं --
भावगीतें शांतवाहीं,
मग चढुनी गुंगी गोड अंतरीं स्मरण-बाधा ही हरेल्.

## विरही

जाति – नृपममता

हर मी न अनंगा ! व्यर्थ —
कां होसी मजवरि कुपित ?
ही मृणालमाला हृदयीं;
नच सर्पराज हा, पाहीं !
कंठांत नीलकमलांची —
माला ही; गरल नसेची !
सखिविरहताप ना साहे,
चंदनी उटी देहीं हे !
हीं भ्रमें विभूती गणुनी,
छळिसि कां प्रहारा करुनी ?

## मोकळ्या मनाचें गाणें

वृत्त – शार्दूलविक्रीडित

अस्ताद्रीवर मंदमंद हसते संध्या अहा ! सोज्ज्वल;
हंसी चंद्रकला तिची मुदित ही लाटांसवें चंचल,
तारा-मौक्तिक वेचुनी विहरते आकाश-गंगेवर;
यांच्या पावन दर्शनें झडुनि ती गेली तुझी सत्वर —
चित्ताची जडता खरोखर सख्या ! तेणेंच ऐसें स्फुरें —
गाणें अंतरिं हें खुल्या मधुरसें, ओंठांवरी पाझरें !
गा ! गा ! स्वर्भुवनीं असाच उडुनी जा गुंगतां गुंगतां !
दिव्यानंदरसीं क्षणैक सखया ! आत्मा बुडूं दे अतां !
नैराश्यें घनघोर अंध बनुनी मी हाय ! भोवंडतों;
शून्या दृष्टि चहूंकडे फिरवुनी वेड्यापरी पाहतों !
ऐसें हें जडतापिशाच बसलें आहे उरीं माझिया;
वाचे शब्द न एकही फुटतसे भीतीमुळें त्याचिया.
केवीं गोड अशीं मुखांतुनि सख्या ! गाणीं निघावीं तरी !
हेवा यास्तव वाटतो मज तुझा ! मातें क्षमा तूं करी !

## मोहावृत

वृत्त-शार्दूलविक्रीडित

होतों बैसुनि जात अग्निरथिं मी ग्रामांतरा दूरच्या;
होती सन्निध बैसली मम सुता बाला प्रिया माझिया.
शेतें, डोंगर, वृक्ष, खंदक, नद्या टाकीत मागें, रथ —
वेगें धांवतसे पुढें, बघुनियां बाला वदे विस्मित,
“ देखा, संप्रति चाललों कितितरी वेगें महा आपण ! ”
गेलें तद्वच ऐकुनी भरुनियां माझें विचारें मन.
होता तो रथवेग साच, परि ती होई मनीं हर्षित;
संगीं रंगुनि तो स्वकीय समजे, होऊनि मोहावृत.
वेगानें त्रिगुणात्म विश्वरथ हा धांवे सदा प्राकृत;
धांवे त्यावर जीवराज वसुनी नित्य प्रवासीं रत;
संमोहूनि गुणत्रयीं जखडिलें आत्म्याप्रती सर्वथा,
“ वेगें आपण धांवतों ! ”, भ्रमवळें वाटे जिवाला वृथा !
गर्वें गर्जत चालला प्रकृतिचा थांबेल केव्हां रथ ?
जीवा निश्चलता कळून अपुली येईल का शाश्वत ?

## पुष्पराजी *

जाति - चंद्रकांत

डोंगर-खोऱ्यांच्या वरोनी आभाळीं उंच
मेघखंड जैसा संचरे, तेविं एकलाच —
होतों हिंडत मी; अचानक पडला नजरेला
सुंदर सोनेरी सुमांचा समूह फुललेला.
जवळ तडागाच्या, खालतीं आणिक वृक्षांच्या,
फडफडतीं सुमनें, नाचतीं संगें वायूच्या.

सलग सांद्र जेशा तारका नभगंगेमाजीं
तेजें चमचमती, तशी ती सुमनांची राजी
तीरिं तडागाच्या पसरली अनंत रांगेंत;
लक्ष फुलें एका देखिलीं दृष्टिक्षेपांत.
हर्षोत्साहानें नर्तनीं गुंग किती झालीं !
शिरकमलें होतीं नाचतां डौलें वर-खालीं !

तरंगही त्यांच्या नाचले समीप चमचमत,
जिंकियलें त्यांहीं तरंगां परंतु हर्षांत —
हर्षपूर्ण मेळा लाभतां मित्रांचा ऐसा,
हर्षित नच होतां राहिल कविवर हो कैसा ?
अचल लोचनांनीं निरखिलें, परि न मनीं आलें,
दृश्यानें मातें कोणतें धन अर्पण केलें.

कारण, नच जेव्हां विहरती विचार हृदयांत,
दु:खद वा भरुनी विचारें विकल होई चित्त,
शय्येवर पडतां तदा, तो समूह सुमनांचा
पुढतीं मम चमके नेहमीं अन्तश्चक्षूच्या,
—— एकांतातिल हा अमोलिक ठेवा सौख्याचा !
मानस मग माझें भरोनी आनंदें रंगें;
थयथय नाचाया लागतें सुमनांच्या संगें !

वर्ड्स्वर्थ कवीच्या ‘ द डॅफोडिल्स् ’ ह्या कवितेचा अनुवाद.

## वाम-नयन-स्फुरण

वृत्त—शार्दूलविक्रीडित

कां ऐसा स्फुरतोस वाम नयना ? भूलोकिं या भावि तें
येसी तूं सुचवावया अशुभ रे ! सांगें मला कोणतें ?
पावे निष्फलता मनोरथ असा आहे कुठें तो तरी ?
मातें भग्न कपर्दिकाहि न गमे ती प्राप्य या भूवरी !
आला जन्म कसा कुठून न कळें; एकेक त्याचा क्षण
लोटीं शून्यमनें कसातरि पहा ! हा दीर्घ कल्पाहुन.—
पानें सर्व गळून झाड अवघें येथें खराटा नटें;
लागे आंतुनि कीड ! तें अशुभही आतां उरें कोणतें ?
ये ये, वा, अशुभा ! न मुग्ध असल्या राहूं भविष्योदरीं;
आहें स्वागत बा तुझें ! न असली संकोचवृत्ती धरीं.
माझी एक सख्या ! परंतु विनती नम्रा असे त्वत्प्रती,
की वार्ता अशुभा अशी कथिं मला, संमूढ ही मन्मती —
तेणें होवुनि जीव विस्मृतिमधें नांदेल हा शाश्वत,
ब्रह्मांडांत अनंतकोटि भरुनी राहील संचारत !

## घरीं वीरा मृत आणिलें तयांनीं

जाति – दिंडी

घरीं वीरा मृत आणिलें तयांनीं,
तरी आलें नयनीं न तिच्या पाणी;
प्राण तीचे गेले न विमोहून,
रुदन शब्दहि ना फुटे मुखांतून.
सख्या वदल्या निरखून तिच्या सार्‍या,
हृदय शोकाकुल हिचें होउनीयां,
अश्रुमोचन पाहिजे व्हावयाला;
मरण ना तरि येईल कीं हियेला.

शब्द बोलुनि मृदु मंद तयीं कोणी
वदे त्याच्या सद्‌गुणा प्रशंसोनी;—
'पात्र होता प्रीतीस, लोभ त्याच्या
ठायिं जडला बहु सकलही जनांचा;
शुद्ध मैत्रीला तयाच्या न मोल,
वैरि असतां औदार्यही विशाल.'
तरी नाहीं बोलली मुळीं कांहीं,
राहि निश्चल बैसली त्याच ठायीं.

कुणी रमणी मग उठोनी सुरूप,
हळू वीराच्या पातली समीप;
वस्त्र वदनींचें दूर तिनें केलें,
वदन त्याचें तयिं दृश्यमान झालें.
जरी दिसलें मुख तयाचें तियेला,
गेलि निश्चलता तिची ना लयाला;
नसे अश्रूचा नयनिं तिच्या लेश,
शुष्क पल्वलसम साच तीं उदास.

वृद्ध उठली सेविका एक अंतीं;
वयें होती नव्वदाची पुरी ती.
घेउनीयां बालकाला तयाच्या,
तिनें मांडीवर ठेविलें तियेच्या;—
ग्रीष्मिची तों वादळी वृष्टि थोर,
जेविं धरणीवर वर्षते अपार,
तेविं आला नयनांस तिच्या पूर,
गालि गळलें घळघळा अश्रुनीर;—
आणि वदली, "लाडक्या, सोनुल्या रे!
तुझ्यासाठीं जगणार मी जगीं रे!!"

## अभागिनी

वृत्त - मंदारमाला

वाहे नभीं प्रेमगंभीर गंगा
प्रभातीं रवीच्या द्युतीची यदा,
प्राचीमुखींच्या प्रमोदावलीची
न दिव्या कुणीं देखिली संपदा !
चंद्रोदयीं यामिनी मुग्ध बाला
नभःप्रांगणीं प्रेमलज्जान्विता
मोदें हसे, तारका-रत्नमाला
प्रियाच्या गळां मोहुनी घालितां !
होती वसंतागमीं कुंजकुंजीं
समुत्फुल्ल भारी सदा वल्लरी;
अर्पावया प्रेममाला तयाच्या
मुदें डोलती पादपद्मावरी !
देतां मुदें बालका--प्रेमपुष्पा --
स्वतां चुंबुनीयां प्रियाच्या करीं,
स्मेरानना कामिनी दृष्टि फेकी
किती लाजुनी तन्मुखश्रीवरी !
चाफेकळी खोविली केशपाशीं
परी साजिरी उल्हसूनी मनीं,
आलोकितां मी, तिनें टाकियेली
त्वरें कुंतलांतूनि ती काढुनी !
अन् दाटले तैं तिच्या शुभ्र भाल -
प्रदेशीं, मुखीं, म्लानतेंचे घन !
सौख्यें निसर्गक्रमप्राप्त, देवा !
दिलीं वस्तुजातां तुवां अर्पुन;

झाली अशी हातुंनी वालिकेच्या,
वदें, दुष्कृती कोणती दारुण ?
भोगी तिचीं या जगीं वाउगीं ही
फळें संप्रती मौनता सेवुन !

## पतित मातेस

जाति – साकी

हाय हाय ! गे काय तुझी ही कसाब करणी, आई !
पोर पोटचें तेंहि तूझिया सललें नयनीं, बाई !
तूंच, माउली ! चरचर चिरिला कंठ तुझ्या बाळाचा !
तूंच, माउली ! सडा घातला बाळाच्या रुधिराचा !
सुरी करीं तूं काय धरियली ? कंप करीं नच भरला ?
काय न आला कांटा अंगीं ? पाय मुळीं नच खळला ?

‘आई ! आई !’ बाळ बोलतां काकुळती येवोनी,
उर:सागरीं उचंबळोनी गगनचुंबि लाटांनीं
अमर्याद वात्सल्य, माउली ! चर्मसेतु भेदोनी
तुझिया पान्हावल्या स्तनांतुनि आपोआप गळोनी -
पयोमिषें, तव परिसरवसनहि चिंव नसें का झालें ?
चिमण्या बाळा काय न अपुल्या स्तनीं तुवां लावियलें ?

सुरसरितेला लाजविणारी वत्सलता तव, आई !
कशी आटली तुझ्या मानसीं हाय हाय ! लवलाही ?
स्वर्वासातें विटुनि देवही राजहंस होतात !
वत्सलता तव चाखायातें भूवर अवतरतात !
वत्सल हृदयावरच्या एकच उच्छ्वासें तव, जननी !
अनंत ब्रह्मांडातें निमिषीं न्यावें उद्धारूनी !

मधुर सुधेहुनि बोल बोबडे मंजुळ परिसायाचें
निज बाळाचे लिहिलें नाहीं भाळीं अपुल्या साचे !
म्हणून कोणी रमणी अनुदिनिं खिन्न मनीं होऊनी
वदन चंद्रमा मळविति अपुला सुचिर अश्रु ढाळूनी !
परंतु उदरीं देवदयेनें देउनि जन्म सुतातें,
तूंच निर्दये ! यमसदना त्या घालविलें निज हातें !

स्नान-दान-व्रतवैकल्यादिक कोणी आचरितात;
देव-देवता सकाम भक्तीनें कुणी पूजितात;
कुणी भाळते ताइत-अंगाऱ्यातें भोळी जात;
घोर तपातें आचरावया कुणि वनवासा जात;
यज्ञ-यागही कुणी मांडिती बघण्या सुतवदनाला;
निशाचरी ! तूं परी घेतला वळी पोटचा गोळा !

उपाय सारे हरले ! नाहीं पुत्र पोटचा आतां !
नैराश्याचा पंथ तमोमय कष्टें कंठित असतां,
वंशवृद्धि व्हावयास धरिती धर्मशास्त्रही कोणी;
बाळ कुणाचातरी निजांकीं प्रेमें कुरवाळूनी,
निजवंशाची ज्योतिच लटकी पाजळिती अंधारीं !
सत्कुलदीपक मालविला तूं घालुनि फुंकर जहरी !

फूल चिमुकलें सुकलें पाहुनि सहज कुठें लतिकेचें,
मृत बाळाची स्मृति निज होउनी कुणा सतीच्या साचे
पाणी पाणी क्षणांत साऱ्याही हृदयाचें व्हावें !
अश्रुबिंदुंचे मौक्तिक घळघळ नयनांतून गळावें !
प्रलयविद्युते ! घोर कडाडुनि लोळ विजेचा एक --
पाडुनि अपुल्या उद्यानाची तुवां बनविली राख !

लटका आविर्भाव जरासा रागाचा आणोनी,
दृष्टिआड जरि निमिष जाहलें बाळ आपुलें रुसुनी,
जननीहृदयें कुणीं सारखें खालीवर तरि व्हावें !
काडिआड तें गढीआडसें त्यालागी भासावें !
अनंत बाळाच्या अपराधां तयें घालुनी पोटीं,
खिन्नपणें नच लागोद्यावी स्वप्रेमा ओहोटी !

कालभुजंगी ! परंतु जहरी डंख तुवां मारियला —
अपुल्या बाळा ! वाघिणी ! तुवां कवळ तयाचा केला !
रंगनाथ रांगता आपुला, पूतनिके ! वेल्हाळ
स्तनीं लाविला जहरी अपुल्या ! कालहुताशनि ! बाळ-
स्वाहाकारें स्वयेंच अपुलें स्वतांमधें होमियलें !
नरकपुरीचें लाथ मारुनी द्वार तुवां खोलियलें !

गृह-आकाशीं बालचंद्रमा कोमल किरणीं खेळे,
पाहुनि जननी कुणी वदे, ' मी धन्य धन्य गे झालें !
अहा ! लाधला आज घराला माझ्या बाई सान
देवेंद्राच्या अनुपम सुरुचिर सदनाचा बहुमान !
चांडाळिणि गे ! परंतु अपुला बाळ धुळीं मिळवून,
हाय ! बनविलें घोर आपुल्या सदना तुवां स्मशान !

माय माउली भोळी कोणी बहु हळव्या हृदयाची !
बाळ आपुला सेवितांहि ती झोंप सुखें अमृताची,
नसती भीती मनीं येउनी, डोळा नच लागोनी,
रात्रीमाजीं कितीक वेळां पाही डोकावूनी —
बालमुखाब्जा, तया न सीमा, हुरहुर शमवायातें —
निज चित्ताची, येइ न समता ज्याची स्वर्भुवनातें.

गंधर्वांच्या गोड गोड ते गाण्याचे आलाप
स्वप्नीं परिसुनि मंद विहरतां गालीं हास्य अपाप,
घनश्याम गे श्रीरामावर, कैकेयी ! तूं अपुल्या
कुऱ्हाड आकाशाची, अदये ! हाय पाडिली वाया !
आनंदी ! तुज धीर गारदी येती तों न निघाला,
निज नारायण करें खंजिरें स्वयें क्षणीं उद्धरिला !

कळिकाळाचा जहरी वारा हाय ! कोठुनी आला ?
वाफारा तो लागुनि कलिका कुणा लतेची लोला
मान मोडुनी पडली, सुकली दिसली जरि नयनांला,
परम अमंगल निधन-कल्पना बाळाची-हृदयाला,
नवनीताहुनि मृदुतर, नाहीं तिच्या मुळींही शिवली !
राजहंस मम निजला ! म्हणुनी त्यासह चिर ती निजली !

कामवासना-यतिवर तुझिया परंतु सदना आला,
पुत्रमांस भोजना तुझ्या तव करीं याचिता झाला !
सत्त्वधीर गे तुवां, चांगुणे ! सत्त्वा राखायाला
समक्ष यतिच्या बाळ घातला उखळीं कांडायाला !
अश्रुजलाचा थेंब न एकहि निज नयनीं आणियला !
सत्त्व राखिलें ! भोजन घालुनि यतिवर संतोषविला !

यतिराया ! तूं तोषुनि दिधला आशीर्वाद सतीला !
"निपुत्रिकेचें मुख न बघावें !" नीति न ठावें तुजला ?
नीति कशाची ! न्याय कशाचा ! यतिवरही तूं कसला !
निर्दय असुरच अवतरलासी सतिसुत भक्षायाला !
नांव दयेचें, धर्माचें नच आढळणें तव गांवीं,
तव निंदेचीं उगीच आम्हीं का मग गाणीं गावीं ?

श्रियाळरमणी ! चिलयाजननी ! देवि चांगुणे ! आर्ये !
जगन्मंगले ! विश्वमाउली ! सच्चिद्रूपे ! माये !
करुणाकादंबिनी ! पावने ! चरणसरोजीं लीन,
याचितसे तुज भीक एवढी दास तुझा हा दीन :–
मनोमंदिरीं ये आईच्या ह्या पाषाणहृदेच्या !
हांक मारुनी बोलावीं गे बाळा परत हियेच्या !

वत्सलतेविण ओस जाहलें जगताचें उद्यान !
वधुहृदयाचा नरक जाहला वत्सलतेवांचून !
हांक मारुनी सद्‌गदित स्वरिं, वत्सलतेविण, बाळा-
बोलावोनी परत, आपुल्या नेवोनी हृदयाला,
अश्रुफुलांची माळ घालुनी कोण अतां कंठांत,
चुंबुनि तद्वदनावर फिरविल निज प्रेमांचित हात ?

आदिमाउली ! वत्सलतेची त्रिभुवनपावन गंगा ––
सोडुनि संप्रति करिं लवलाही ह्या अबलेस शुभांगा !
"ये ये ये रे !" बोल माउली ! वाचें गहिवरलेल्या,
"ये रे ये ! मम राजस बाळा ! येइं गडे वेल्हाळा !
येईं धांवत ! मार गळा मिठि ! येईं गोजिरवाण्या !
अंकीं घेतें, कडिये घेतें, येईं माझ्या चिमण्या !

"ये ये ! नाहीं लोटित आतां माझ्या बाळा दूर !
मुखकमला तव बघण्या झालें आतुर मी अनिवार !
गोड गोड तव घेतें पापा, सोड लाडक्या रुसवा !
गोड गोड हा साखरखाऊ देतें बाळा, अथवा !
नाचत हांसत येईं ! बोलत बोल बोवडे मधुर ––
येइं गडे, मम ऐकायाला झाला जीव अधीर !

“ हांक न बाई ऐकायला येई माझी बाळा !
—— गंधर्वांच्या बाळांसंगें गेला खेळायाला ! ——
स्वर्भुवनाच्या तेजोगर्भी नंदनवनिकेमाजीं
निसूर रमला, नाहिं तयाला भान राहिलें आजी !
अशीच बाई आणायाला माझ्या गे चिमण्याला,
ही मी निघतें सत्वर आतां स्वर्भुवना जायाला ! ”

## गुलाबी लपंडाव

वृत्त–शार्दूलविक्रीडित

होती चालत मंद मंद युवती कोणी पुढें माझिया ——
मार्गांतून; अहा ! सुरम्य विलसे मार्गें तिचा पाहण्या
काळा केशकलाप; दाट गळला मानेवरी कांहिसा
अंबाडा मधु पट्टिचा विपुलसा; अत्यंत बालार्कसा
चेतोहारि नवा गुलाब हंसरा त्याचेवरी खोविला,
वाटे, मेघ सुनील बालचपला आलिंगिते मंगला !
चित्तीं प्रीति-गुलाबगुल्म फुलला, खेळू फुलें लागलीं;
गालीं नाचुनि हांसली, सवंगडी शोधावया धावली !
पुष्पांनो ! गमते, तुम्हीं सकल कीं गेलाच वेडावुनी,
धावा व्यर्थ असें ! कुणी हनुवरी, नासाशिरीं वा कुणी,
डोळ्यांचे कुणि पुंडरीक डुलवा, भाळीं चढा वा कुणी,
कानांच्या कुणि शुक्तिकांस लववा ! नाहींच तेथें कुणीं !
कां घेतां नि असा गळ्यास वळसा ? ये कोण येथें असें ?
‘ अंबाड्यावरि तें कुणी लपुनि ना बैसें ! न कोणा दिसें ! ! ’

## प्रीतीचा पर्वकाळ

वृत्त - मंदाक्रांता

संक्रांतीचा दिवस सखये ! आज आला अमोल !
सत्प्रीतीचा शुभतम महा पातला पर्वकाळ !
सांगाया हा पुढतिं सरला दूत वार्ता जगास :–
सम्राज्ञी ये भुवनविजया प्रीतिदेवी सुहास !

संक्रांतीचा दिवस सखये ! मोददायी उदेला !
झाली पर्युत्सुक निज मनीं कोमला सृष्टिबाला !
प्रेमें तीतें रवि निज करीं देइ आलिंगनाला !
आली वाटे विमल जगतीं मंगल प्रेमवेळा !

गेली खिन्ना हिमपरुषता पाहिं सारी लयाला !
विश्वोद्यानीं नवकिसलया प्रीति आली भराला !
ठायीं ठायीं करिति लहरी प्रीतिच्या नृत्यलीला,
उल्हासानें नवकुसुमिता येतसे भूतलाला !

गाऊं आतां सुरस सखये ! संतत प्रेमगीत !
भारूं सारें भुवन अपुल्या गीतनादें नितांत !
वैषम्याचें अशुभ नुरवूं नांवही दैन्यवाणें,
विश्वैक्याचें रुचिर झरवूं मंगल प्रेमगाणें !

येई मोदें खळखळत गे प्रेमगंगा मदीय;
तेवीं रम्या प्रणययमुना पावना ही त्वदीय;
शोभे त्यांचा शुचिरुचिर हा संगमाचा सुयोग,
होई येथें विमल अपुलें श्रेयकारी प्रयाग !

या प्रेमाच्या फुलवुं अपुल्या बाग तीरीं विशाल,
तत्सौरभ्यें भरुनि अवनी मोदभारें खुलेल !
पुष्पीं येथें भ्रमर करुनी गोड गुंजारवाला,
हृद्देशींचें सजतिल सुखें गूज सांगावयाला !

उद्यानीं या अनुपम सदा एक नांदे वसंत !
पुष्पें येथें मधुमय समुत्फुल्ल आमोदवंत !
स्वैरालापें पिकतति करी कूजना नित्य येथं !
वाहें तैसें विमल सतत स्त्रोतसांचें सुगीत !

शोभे येथें अभिनव सदा जीवनाचा गुलाब,
सत्प्रेमाचा सतत वितरी बुल्बुला दिव्य लाभ !
पेला येथें सतत भरला प्रेम-मद्यें सुरक्त,
धुंदीमाजीं पिउनि विहरूं गात उन्मादगीत !

प्राशोनी ही विपुल मदिरा मत्त होऊं मदानें !
विद्वानांचीं हंसतिल हंसो तीं कुलें तुच्छतेनें !
पायीं साऱ्या विफल तुडवूं नीतिच्या बंधनांला !
स्वच्छंदानें अशिव उधळूं अंतराळीं धुळीला !

## तिळगुळ घ्या ! गोड बोला !

**जाति – भूपतिवैभव**

हा तिळगुळ घ्या हो ! बोला मंजुळ बोला !
संक्रांत-सुमंगल-दिवस आज हा आला !
प्रीतीला हृदयीं उधाण आली भरती,
अन् माणिक-मोतीं उसळुनि आलें वरतीं !
घेउनी तेंच तुज पाठविलें, सखया रे !
जन म्हणती तिळगुळ गोड तयांला सारे.
हृदयांतिल माझ्या प्रीतीच्या वेलीला
हा दिव्य फुलांचा बहर मनोरम आला !
अन् खुडुनि तियेचीं तींच सुगंधित सुमनें,
तुज पाठविलीं रे ! धरीं करीं प्रेमानें !

## लक्ष्मीपूजन

वृत्त-शार्दूलविक्रीडित

लक्ष्मीपूजन हें घरोघर ! नवीं लेवून वस्त्रें जन --
जाती हर्षितमानसें धनिगृहीं थाटांत रस्त्यांतुन.
सत्कारी यजमान अत्तर-तुरें देऊन त्यां आदरें, --
लक्ष्मी भूवरि कीं पयोधितनया आविष्कृता संचरे !
नांदे मन्मनमंदिरांत अशुभा ही शून्यता-शर्वरी !
लक्ष्मी मानसमोहिनी न विहरे, ती लोपली सुंदरी !
प्रीतीची मधु वीक्षितें न भरितीं मांगल्य हृन्मंदिरीं !
व्यापोनी जड भीषणा शिशिरता ये खिन्नता अंतरीं !
देवी ! मूर्ति तुझी सुमंगल जरी ना होइ दृग्गोचर,
अस्तित्वीं तव हा अभंग हृदयीं विश्वास माझा स्थिर !
प्रीतीची जळती चिरंतन अशी ही ज्योत मी पाळिन;
आहे धीर, विमोहुनी मजसि तूं देशील आलिंगन !
हृज्ज्योती परि पाजळून तुजला गातों अतां आरती,
अश्रूंनीं भिजली सुमांजलि मुदें ही अर्पितों त्वत्प्रती !

## करुणासिंधो ! दावीं मजला वाट

जाति - साकी

तेजोरूपा करुणासिंधो ! दावीं मजला वाट !
ने पुढतीं चौफेर पसरल्या तिमिरांतुनि घनदाट !
भीषण काळोखी ही रजनी ! धाम असें मम दूर --
लक्ष ठेविं मम चरणीं; नाहीं आकांक्षा मज फार;
दूरदूरचीं दृश्यें नाहीं देखायाची आस, --
पुरेल मजसी एकच पाउल पुढतीं टाकायास.

चरणयुगा तव शरण रिघावें, विचार मनिं नच आला;
प्रार्थियलें वा कधीं न तुजाला पथ मज दावायला.
स्वपथ करोनी पसंत झालों सिद्ध सदा सेवाया;
परंतु ने पुढतीं मज आतां विनवितसें तुज, सदया !
नटव्या दिनवैभवा भाळलों ! अहंकार मनिं भरला —
अनर्थकारी ! नको आठवूं मदीय त्या गत काला !

तुझ्या कृपेची नित्य धरियली पांखर तूं मजवरतीं,
पथ मज दाविल तीच अजुनही निश्चित वाटे चित्तीं !
कडे, कपारी, रानें, दल्दल, सागर, सरतांवरुनी
मजलागी ती नेइल पार ! नि विलया जाउनि रजनी,
प्रभात होतां दिव्यानंदें हंसतिल मुखकमलें तीं,
प्रेमजलें जीं सदा सिंचिलीं, अचिर हरपलीं होती.

## गंगास्तवन

जाति – रसना

[ जयदेव कवीच्या घरच्या विहिरींत भगवती जान्हवी प्रकट झाली. त्यावेळीं त्यानें तिची पुढीलप्रमाणें स्तुति केली. ]

गंगे त्रिलोकमाते ! तव वंदितों पदाला !
दासास जान्हवी गे आलीस तारण्याला !

बहु जर्जरा जरेनें झाली मदीय काया;
करुणा अतीव आली, देवी ! त्वदंतराला !

स्नानार्थ जावयाला तीरीं न शक्ति मातें;
वापींत माझिया तूं आलीस मंदिराला !

तीरीं तुझ्या वसावें, त्वन्नीर गोड प्यावें,
निष्काम आठवावें हरिपादपंकजांला !

देवी ! कृपाघनाची वृष्टी तुझ्या करून,
नाशून सर्व पापें स्वर्लोकिं ने अम्हांला !

निववील पापतापा, नेईल दिव्यधामा,
कणिका तुझ्या जलाची स्पर्शेल ज्या जिवाला !

स्वर्गाहुनी धरेला आलीस, देवि गंगे !
हरमस्तकीं विभूषा झालीस तज्जटेला !

उल्लंघुनी प्रमोदें कनकाद्रिच्या कड्यांना,
अघराशि नाशण्याला आलीस भूतलाला !

पृथ्वीवरून जाशी रत्नाकरा वराया,
ने शीघ्र, जन्हुकन्ये ! आम्हांस सत्पदाला !

## धन्य, राजसा ! केलें मजला !

**राग – मालकंस**

[ राणी चांगुणा चिलयाचें शिर उखळांत घालून कांडीत असतांना पुढील गाणें गातें – ]

धन्य, राजसा ! केलें मजला !
घेउनि उदरीं मम जन्माला. ।।ध्रु.।।

सुकुमारा ! रे राजनंदना !
सुहास्यवदना ! पंकजनयना !
सद्‌गुणवंता ! शीलनिधाना !
दुबळी तुजविण मी, वेल्हाळा !

तुजविण आतां, रे गुणवंता !
परदेशी तव भणंग माता !
कोमल तव तनु ! लागति माथां —
निष्ठुर माझे धाव, प्रेमला !

फुटला पान्हा स्तनयुगलाला,
कंचुकीतुनी गळति धरेला —
दुग्धाच्या रे धारा विमला !
अभागिनी मी पाजुं कुणाला ?

राजमंदिरांतुनि बाहेर —
जेवुनि पडतां सुखें यतिवर,
क्षणीं त्याच रे त्यजिन शरीर !
निर्धार मनिं असे मीं केला !

धीर न धरवें मम चित्ताला !
कैलासाच्या धरुनि पथाला,
एकलाच कां टाकुनि मजला —
निघसि, बंधनां तोडुनि सकलां ?

तुझ्याबरोबर मी येणार;
माझ्यास्तव रे थांब घडीभर !
तुझ्यासंगतीं मम उद्धार —
होइल, जाइ न टाकुनि मजला !

तुजविण मी तळमळतें दीन !
उदकावांचुनि जैसा मीन !
कठोर वज्राहुनि माझें मन !
केविं दाखवूं वदन जगाला ?

तुझी, कोमला ! रे मी माता !
लाज वाटते मजला म्हणतां !
जगीं करोनी निज सार्थकता,
गेलासी तूं शिवधामाला !

त्रिभुवन शोधोनी न मिळेल
गुणी तूझिया समान बाळ !
अर्पुनि सुमसम तनु सुकोमल,
आजि राखिलें तूं सत्त्वाला !

## वृद्ध आंधळा – १

**वृत्त – शार्दूलविक्रीडित**

ये ! ये ! ये ! पृथिवीवरी त्यजुनियां स्वर्गा दयादेवते !
या वेळीं रुचतो कसा सुखद गे स्ववांस, माते ! तुतें ?
आई आर्त जनांस तूं ! तव कसें वात्सल्य गेलें लया !
पुष्पाहूनहि जें सुकोमल कसें केलें मना वज्र त्या !
काठी टेंकित चालला हळुं हळू हा वृद्ध गे ! आंधळा ––
रस्त्यानें, करुणस्वरें विनवितां लोकां पहा, भागला.
पोटातें भरण्यास हाय ! करणें लागे हकाटी किती ––
यातें, ना द्रवते परी हत अशी येथें कुणाची मती !
येथें संप्रति साच एक नुरला कारुण्यबिन्दू, सती !
गे देवी करुणानिधे ! नयनिंच्या तूं अश्रुधारांप्रति ––
वर्षीं मस्तकिं याचिया, करिं झणीं न्हाणोनियां पावन;
नाहीं काय कसोटिला उतरला अद्यापिही हा जन !
याची भिस्त अतां असे, सुसदये ! सारीच तूझ्यावरीं !
होतां विन्मुख तूंच कोठं मग गे जावें तयानें तरी ?

## वृद्ध आंधळा – २

वृत्त-शार्दूलविक्रीडित

ये ! ये ! ये ! गिरिकंदरांतुनि, मुने ! बाहेर तूं सत्वर;
प्राणायामरता निरर्थ झटसी कां शोधण्या ईश्वर ?
सन्यासी ! न्यस तो क्षणैक आपुला संन्यास रे निष्फळ;
योगीशा ! तव ती विरक्त मति तूं आसक्त ठेवीं पळ;
भक्ता ! भक्तिरसीं बुडोनि तुझिया गेला पहा, देव तो,
नाहीं बाहिर येत; निष्फल किती बा आळवीतोसि तो ?
सृष्टीची मधु मोहनी तुज कशी टाकी, कवे ! मोहुनी ?
तीच्या का बहिरंगि देव बसतो त्या नाचऱ्या येवुनी ?
भक्ता ! योगिवरा ! मुने ! कविसख्या ! सन्यासि ! याहो चला ––
सारे सत्वर, वृद्ध हा हळुं हळू चाले पहा, आंधळा !
प्रेमानें तनु होउनी पुलकिता द्या गाढ आलिंगना ––
यातें बाहुयुगीं ! न ईश्वर जगीं तो अन्य हो याविना !
याची पावन चस्तकीं अपुलिया ती पादधूली धरा !
तन्नेत्रांतिल अश्रुतीर्थ विमल प्राशून मुक्ती वरा !

⚜ ⚜

## ये चिलया ! चिमण्या बाळा !

जाति – उद्धव

ये चिलया ! चिमण्या बाळा ! ये धांवत रे वेल्हाळा !
ये नाचत हांसत, छकुल्या ! झणकारित घुंगुरवाळा ! ॥ध्रु.॥

मांडीवर बाळा घेतें !
कटिवरी तुला बसवीतें !
नाहिं दूर लोटित तूतें !

का रुसुनी टाकुनि मजला गेलास कुठें, लडिवाळा !

दे सोडुनि रुसवा आतां ! ये हांसत, रे गुणवंता !
पाडसा ! सोनुल्या ! माझ्या, बाही तव वत्सल माता !
बहु गोड गोड मी तूतें
आवडता खाऊ देतें !
पापाहि गोड तव घेतें !
कुरवाळिन हृदयीं तुजला ! झणिं येईं, राजस बाळा !

वाट तुझी अतित पहातो, तुजवांचुनि घांस न घेत !
दाखवीं तया, सुकुमारा ! तव वदनचंद्रमा मुदित !
लवलाही जरि नच येसी,
अति येइल कोप तयासी;
नेईल हरुनि सत्त्वासी !
ये तया तोषवायाला ! सत्त्वाला राखायाला !

स्वर्गीतिल बाळांसंगें खेळाया जासी खेळ,
सदनाला विसरुनि अपुल्या रमलासी तेथें, बाळ !
बघुनी तुज मोहित होती
गंधर्व बालकें चित्तीं !
गायनीं तुला गुंगविती !
भूल कशी पडली तुजला ? ये आम्हां रिझवायाला !

नृपमंदिर तुजविण मातें ओसाड रानसें वाटे !
अंधार अंतरीं दाटे ! आधार जिवा ना कोठें !
आला मम कंठीं प्राण !
जाईल देह सोडून,
जरि येसि न रे धावून !
लवलाही ये, स्नेहाळा सुखवाया निज मातेला !

## नवा मनोबोध

वृत्त - भुजंगप्रयात

मना ! देव ना मानिजे रे पित्यासी,
कधीं वंदिजे ना तयाच्या पदांसी !
अवज्ञा तयाची तुवां नित्य कीजे,
शिरीं पुष्पवृष्टी शिव्यांची करीजे !

विपर्यास कीजे सदा तत्कृतीचा,
तसा त्याचिया वागण्या-बोलण्याचा !
मना ! दुष्ट अश्लील आरोप कीजे-
तयाचेवरी साफ खोटे ! न लाजें !

असे त्याजपाशीं जरी द्रव्यसाठा,
धरीजे तयाचा सदा लोभ मोठा !
न देई खुषीनें जरी तो धनातें,
करीजे तयाच्या मनस्वी छळातें !

मना ! खेटरानें तयासी पुजावें !
प्रहारा शिरीं लोहादडें करावें !
धरावें तयाचें न वृद्धत्व चित्तीं !
भयें तूझिया वित्त सोडील हातीं !

कृती आसुरी रे करोनी सुयुक्त,
लुटावें धनातें तयाच्या समस्त !
" तुझ्याशीं न संबंध आतां " म्हणून,
घरांतून देई तया हाकलून !

मना सज्जना ! व्यर्थ ऐसे विचार :—
" स्वयें कष्टुनी, हाल सोसून फार,
मला पाळिलें, पोशिलें मत्पित्यानें
वया प्रौढता येइतों आदरानें;

दिलें शिक्षणा योग्य मातें तयानें,
म्हणोनीच सामर्थ्य लाभे सुखानें
मला आजि संसारभारा वहाया,
जगीं जीवना स्वाभिमानें जगाया !"

मना सज्जना ! या जगीं पुण्याकर्म
म्हणोनी कुणी वानिती 'पुत्रधर्म'!
असे नीति ही स्वार्थसाधू जनांची !
नसे ही मुळीं तूझिया रे हिताची !

मना ! सर्वथा सांडि हे दुर्विचार !
त्यजीं सर्वथा पितृसेवा असार !
नको नांव घेऊं कदापी पित्याचें;
असें धाम तें साच रे रौरवाचें !"

मना ! 'भक्तिच्या' याच वाटा विशुद्ध
तुला दाविजे रामदूत प्रसिद्ध !
तुवां याचि रे 'भक्तिपंथें' रिघावें !
तरी 'श्री'-निधी पाविजे तो स्वभावें !

## जगूं देईं सुखें तया

मुला !
रागावलासी तूं पित्यावरी !
सोडुनी बाणावरी बाण
अपशब्दांचे तीक्ष्ण,
तुकडें हृदयाचें तयाच्या करूनी,
काढिलेसी तया तूं बाहेर घरांतुनी !

होतासी लहान वालक वर्षा-सव्वा-वर्षांचा,
जडला तुजलागी आजार दुर्धर न्युमोनियाचा;
हृदयाचें जाहलें पाणी-पाणी पित्याच्या !
केलें तुज तयें औषधपाणी ऋण काढुनी !
डाक्तर जणू देवचि भेटला;
दिधलें तयें जीवदान तुजला !
जीव कीं प्राण करूनी,
कष्टा साहुनी,
सांभाळिलें, वाढविलें पित्यानें तुजसी !

गेलें सरोनियां वालपण;
मोठा जाहलासी. दिधले तुजलागी तयें शिक्षणासी—
जीवनाच्या रणांगणामाझारीं,
विजयी वीराच्या तळपणारें करीं
शौर्यें लढणाऱ्या
शस्त्रचि अमोघ तें !
बळावरी तयाच्या
जिंकियली तूं लढाई जीवनाची !
जगीं नांवारूपासी
आणियलें पित्यानें तुजसी !

होतें त्याजपाशीं धन सांठलें;
यावें निजकरीं तें, मोहें मानस तव ग्रासलें !
वहु सुटला लोभ तुज धनाचा !
केलासि अति छळ धनास्तव पित्याचा !
सत्य केलीस उक्ति :–
पुत्रापासूनीही भीति
असते धनिकाप्रति.

तरीहि आपुलें धन
पुत्रप्रेमें केलें तुज तयें अर्पण !
अन् फेड तयाची तूं केलीस अशी !

भगवान् श्रीहरि त्रैलोक्यनाथ
भेटीस्तव आले दारीं चालत;
न यावा व्यत्यय पितृसेवेमाजीं म्हणूनी,
विटेवरी दिलेल्या झोकुनी
पुंडलीकें ठेवियलें तिष्ठत तयासी !
अन् बाळ श्रावण तो --
कावड करोनी चालला घेवोनी
स्कंधावरोनी
अंध पितयासी
काशीयात्रेसी !
पितृसेवा---श्रेष्ठ धर्म !
पाळियला त्या सुपुत्रांनीं !

मुला !
जागावें त्वां या श्रेष्ठ धर्माला !
पिता तव असे अति वृद्ध जाहला !
अगदीं पिकलें पान !
पडेल केव्हां गळून,
नसे नेम !
नकोस रागवूं तयावरी !
जगलाचि चार-दोन दिवस तरी,
तुझियापाशीं राहुनियां
जगूं देईं सुखें तया !

## गंगालहरींतील पहिले पांच श्लोक

राग - मालकंस

१ तोय सुधामय तव, सुरसरिते !
शमवो अमुच्या अघनिवहातें ! ॥ध्रु.॥
सौंदर्याचें दिव्य निधान !
सकल धरेचें अनुपम भूषण !
लीलेनें करि जग निर्माण,
ऐश्वर्य विशाल शिवाचें तें !
श्रुतिमाजीं जें तत्व गुंफिलें,
त्वज्जलरूपें अवघें नटलें !
सुकृत सुरांचें साच प्रकटलें-
क्षितितलिं धरुनी जलरूपातें !

वृत्त - गीतिका

२ जननी ! अम्हां वितरो तुझा सलिलौघ अक्षय संपदा,
पडतां विलोचनिं एक वारहि जो निवारित आपदा !
अशुभा निरंतर वासना वसती यदीय हृदंतरीं,
झणिं नाशुनी दुरिता तया वितरी पदा चिरसौख्यदा !
जन दीन जे जगिं त्यांचिया हरितो क्षणांत दरिद्रता !
शिकवीत हा, तरुखंडना प्रकृतीचिया, गुरु मुक्तिदा !

जाति – केशवकरणी

३ तरंग आले उसळुनि वरतीं गंगेचे हरशिरीं !
हरो हे अघ अमुचें सत्वरीं !
कपटभावना हैमवतीच्या उफाळली अंतरीं;
प्रकटली तन्मुखकमलावरी !
आरक्त जाहले नयन तियेचे क्षणीं,
उगवत्या भानुबिंबापरि गगनांगणीं !
भेदिलें तिनें निज कटाक्षशर सोडुनी-
तनुलतिकेला सुरसरितेच्या कोमल पुष्पापरी;
कोपल्या तयें तज्जल-लहरी !

जाति – रसना

४ आधार गे कुणाचा आतां मला न आई !
सांगूं कुणा रडोनी मी आपुली व्यथा ही ?
आधार त्वत्पदाचा आहे सदैव मातें,
वाटे अतीव ऐसा विश्वास मन्मनातें !
गेलों फुगून गर्वें सहसा तदा नितांत !
अवमानिले हसोनी सुरसंघ मीं समस्त !
जरि, जान्हवी ! अतां तूं औदास्य सेविशील,
शरणार्थ सांग टाकूं कोणास मी सवाल ?

जाति – उद्धव

५ हृदयिंच्या त्रिविध तापाला, मम शमवो दुरिता सकला,
जलरूप मूर्ति तव विमला ! सुर सकल सेविती सलिला !
अल्पही न केलें सुकृत
जन तुजला जे स्मरतात,
हरिसि तूं तयांच्या त्वरित-
अंतरिंच्या अज्ञानाला, रविकिरण जेविं तिमिराला !

# मानवी संसार व ईश्वरी संसार

वृत्त-शार्दूलविक्रीडित

झालीं वर्षशतें कितीक, विलया स्वायत्तता पावली !
शौर्यें ती मिळवावया पुनरपी भू शोणितें न्हाणिली.
विद्या उन्मद होउनी करि बळें ती मात भूतांवर !
झाले आज निरर्थ शब्द बहुधा हे 'काल' नी 'अंतर' ! !
आश्चर्यें करिते मनास अगदीं जी थक्क विद्युल्लता,
निर्मी कल्पित कोटि रम्य भुवनें ती कल्पना स्फूरिता !
बोले उत्कट भाव, 'सायक जवें हा एकची फेकिन !
मी सर्वेश्वर मूर्त ! हें भुजबळें ब्रह्मांड आंदोलिन !'
धीरोदात्त सुरम्य संसृतिपटीं चित्रें अशीं रंगलीं !
त्रैगुण्योद्भव ही अनंत रचना प्रेमें जयें निर्मिली,
तो शांतेक्षण विश्वसाक्षि कवण्या भावें बघे तीं तरी ?
प्रश्नोर्मी असली हळूच उठुनी चांचल्य चित्तीं भरी.--
"प्रौढत्वा अनुकारुनी वहुपरी बाळें गृहीं खेळतीं;
लीलाकौतुक तें अपूर्णच ! परी माता मुदें पाहती !"

## जात्याची घरघर

वृत्त – शार्दूलविक्रीडित

होती एक कुणी दळित बसली जात्यावरी सुंदरी;
त्याची कर्णकठोर घर्घर भरे साऱ्या गृहाभीतरीं.
त्यायोगें सुखशांतता सुचिर ती होवून अस्तंगत,
होतें खिन्नपणें मदीय हृदयीं अस्वास्थ्य संचारत,
झालें सुंदरिचें दळून सगळें कालांतरानें तदा,
थांबे घर्घरही सुकर्कशरवा तैशी तयीं एकदां,
शांतीचें फिरुनी घरांत पहिलें साम्राज्य विस्तारलें
चित्तातें जडलें उदास मग तें अस्वास्थ्यही लोपलें.
स्वार्थी घर्घर जी अखंड करिती कामादिषड्वृत्ति या,
त्यांचा कर्कश घोर नाद भरला चित्तामध्यें माझिया.
शांतीचा लवलेश ना क्षणभरी लाभे कधीं त्यामुळें;
जीवाला जडता जडून गिरक्या घेतों भवाच्या बळें.
केव्हां सत्सुखशोषिणी जडगती थांबेल ही घर्घर ?
दिव्या घेउनि शांति येईल हृदीं चिच्चंद्र केव्हां वर ?

## मित्रास

जाति – आर्या

रविरंजित मेघांची सायंतन रम्य-नील नव माला —
गिरिकंठीं न पडाया अधीर इतुकी नभीं सरे लोला;
सागर हृदयीं उठती वत्सलतेच्या असंख्य कीं लहरी,
विधुवदना चुंबाया धावति इतुक्या नभीं न त्याहि परी;
सिंधुस भेटायातें झरझर तटिनी निघे सुविरहार्ता,
परि विरहदहन जाळी केंवि तुझा मज, नसेच तिज वार्ता;
रविविरहव्यथित धरी पद्मिनिचें चित्त ती जरी भ्रमरी,
मन्म्लानमनःपद्मा जाणाया ती नसेच शक्त परी;
मधुरसुधा प्राशाया उत्कंठित जरि चकोर चंद्राची,
तन्मानसांत पर्युत्सुकतेचा मम शतांश नच साची;
केकी तृषार्त घनजलबिंदु प्राशावया झुरे भारी,
तदधिक परि तव हृद्घनबिंदुविना जीव तळमळे मदुरीं;
ऐसें असून सखया ! पाठीला पोट लागलें सतत;
त्याच्या विवंचनेमधिं गुरफटलों अग्निसाच राखेंत !

## दयितेचा शोध !

वृत्त - शार्दूलविक्रीडित

कोठें तूं वसलीस सांग, दयिते ! जोगेश्वरी सन्निध ?
किंवा पेठ सदाशिव, स्थित तिच्या हौदाचिया सन्निध ?
शोधूं मी तुजला कुठें ? गलित हीं गात्रें श्रमें जाहली !
उत्कंठा मनिंची न लेशहि परी तेणें असे लोपली !
सारी ही तुजलागि पुण्यनगरी घालूं सखे ! पालथी ?
किंवा गे असशी अशी लपुनियां भूमंडलाच्या पथीं ?
व्योमोद्यानिं निशेचिया खुडिसि का तारासुमें सुंदर --
वेलींच्या वलयांत झांकुनि कुठें, सेवोनि संध्याकर ?
तेजाची नव मंदिरें उभविलीं स्वर्गा कुणीं लंघुनी,
सारीं शून्यभयाण तीं निरखुनी तो खिन्न होई मनीं !
नेलें वाहुनि तेथं कीं विहरण्या तूतें तयें सार्जव,
देखोनी वदनीं तुझ्या सुमधुरा उल्हासवृत्ती नव ?
नाहीं ! -- हे मिटती अहा नयन, ही भेटे सखी अंतरीं !
बोले, 'नाथ ! इथेंच नित्य वसतें, गेलें न कोठें दुरी !'

## पुष्पाभरणें

जाति – स्वर्गंगा

रुसे खेळतां वेला घेउनि पदर लोचनीं वेलींचा,
प्रीतिलतेच्या फेन-फुलांची काञ्ची कटिं रचि सिंधु तिच्या.
अमृत केशरी शिंपुनि गगनीं रजनी रेखी रांगोळी,
मालिति-माला नभगंगेची कंठिं तिच्या विधु ही घाली.
झुरे निकुंजीं शांतिसखी बहु विरहें सुविकल होऊन,
मुक्तालकिं वनफुलें तिच्या मंदानिल गुंफी चुंबून.
लाजलाजुनी गालिं हांसुनी वळुनि शारदा किति वघते,
काव्य-फुलांची दिव्याभरणें लक्ष लेववी कवि तीतें.
शृंगाराची शीतल गंगा परी आणुनी न्हाणून,
कल्पलतांच्या भाव-फुलांचे वहरहि भरभर हे खुडुन,
मृदुल बनविल्या सुमसिंहासनिं कुणास पाहूं बसवून,
'मम चित्ताच्या नंदनांतली मधु वनराणी ही !' म्हणुन ?
करुणजलें हा त्याच करुन तरि अभिषेकच त्या गंगेला,
त्याच फुलांचा खिन्नांजलि हा तिच्या सोडितों धारेला !

## लाटेचा धक्का

वृत्त - शार्दूलविक्रीडित

होतों संसृति-शांत-सागरजलीं स्वच्छंद आंदोलत;
'आलों कोठुनि ? कोण मी ? वसतसें कोठें ?' मुळीं भान न.
झंझावात कुठून काय सुटला ? फोफावली अद्‌भुत --
आकाशांत प्रचंड लाट, तिचिया उत्तुंग शैलावर --
गेलों वाहुनि; लाल, खारट, कडू, फेंसाळ मातीमय --
पाणी, हाणित घोर तीव्र फटके, नाकीं मुखीं संचरें;
श्वासोच्छ्वास पडून बंद अवघा तैं आंतल्या आंतच
लागे जीव हृदंतरीं गुदमरूं, होई बहू घावरा;
तेव्हां भूल उडे ! प्रकाश पडला अभ्यंतरीं लख्ख हो !
गेलीं विस्मृतिचीं घनाभ्रपटलें सारीं विरोनी पहा !
'आलों तेथुनि ! तेथंची मज असें जाणें !' मति प्रस्फुरे.
'तेथें सत्वर कोण नेइल अतां !' हें लागलेसें पिसें !
धक्का संसृति-लाट एकच पुन्हां अत्युग्र देईल कां ?
आत्म्याला चिरशांति चाखविल का चिद्व्योमगर्भांतली ?

ग्रंथालय ठाणे
१८८५२
(स्थळ प्रत)

## जीवितमय आकाश

जाति - आर्या

अर्पोनि पश्चिमेला अनुरागाची सुधा रवी जाई,
अनुपम वैभव म्हणुनी तन्मुखकमलीं फुलोनियां राही;
गगनोदरांत शोभति मेघांच्या रुचिर मालिका रक्त,
आशागुलाव फुललें कपोलपालीं तदीय आरक्त;
संध्यावदनिं अतां परि सुंदर कांती मलूल या होती,
शुष्क फुलें मेघांचीं चितेची काळिमा मुखीं धरितीं ?
काळचा निशा-निराशा-च्छाया पसरत पुढें पुढें येती,
तारा तुरळक---उत्कर्षाची बीजेंच दिव्य---डोकवती;
अद्‌भुत होइ कशाची पूर्वेच्या प्रांगणीं नवी वृष्टी ?
पुनरपि कुमुदें मोदें प्रफुल्ल हसतीं तदीय मुखपृष्ठीं.
आशा रुचिरा केव्हां गगनश्री-मानसास उमलवितें
केव्हां नैराश्याचें कठोर हिम तद्विलास करपवितें.
अन् केविं सह्य विषमें, हीतें तम-तेज-तेज-दृष्टीची ---
अज्ञेयांतिल दिव्य प्रतिभेची चमक ही न उल्केची ! !

## मंगलपाठ

वृत्त शार्दूलविक्रीडित

पूर्वानंदन भानु पूर्वगिरिच्या आरूढ पीठावर;
लज्जानम्र धरा-वधू प्रणयिनी स्मेराननना सुंदर.
गाती मंगलपाठ पक्षि बसुनी वृक्षांवरी सुस्वर;
हो अन्त:पट दूर आरुण ! धरा सेवी रवीचे कर !
हृत्पीठावर होतसें समयिं या आरूढ मी पावन;
येई ही प्रतिभा-वधू प्रियतमा मुग्धा अनंतांतुन.
गाते मंगल भावना मधुर ही गीतें अहा ! नि:स्वन;
सूक्ष्मान्त:पट सत्स्वरूप विरला ! हो स्वादु संमीलन !
आशीर्वाद अतां सुमंगल सख्या ! हा आज देतों तुला, :--
जेवीं सत्कविता ध्वनीसह सदा क्रीडा करी सोज्ज्वला;
किंवा ती रुचिरा अखंड रमते ज्योति प्रकाशासवें;
लाभो संतत ही तुझी सुदयिता संयोग तुझ्यासवें !
आशा एकच मात्र कीं श्रवण हे केव्हां अतां धातिल,
गाणीं ऐकुनियां तुझीं सुरस तीं या दोनतारींतिल ?

## प्रेमाची प्रसन्नता

वृत्त - शार्दूलविक्रीडित

आली भूरमणी चतुर्दशमणी-माला करीं घेउनी --
घालाया मम कंठि, राजमुकुटा किंवा शिरीं स्थापण्या;
नक्षत्रें गगनांतलीं अमित वा दिव्याभ गुंफूनियां
व्योमींचीं नव वैभवें नभ-वधू अर्पील; आनंदुनी
मुग्धा नंदन-सुंदरी गजगती मंदारभूषा जरी
रम्या लेवुनि तद्वनाधिपति वा, मातें करूं हर्षली;
काव्याची प्रतिभा स्वयेंचि करण्या केली जरी लाभली;
किंवा मुक्ति-सुधाधरीं धरियलीं स्वच्छंद रुंजी, तरी --
चित्ताला मम ना मुळींच मिळणें तेणें खरी शांतता !
तृष्णा-सिंधु उफाळुनी वरिवरी जाईल फोफावत,
ऐश्वर्यें जरि लाधलीं अखिलही ब्रह्मांडगर्भंगत !
'व्हावें आणिक !' वासना हृदयिंची होईल ना कुंठित !
मी होईन परी प्रसन्न हृदयीं, ती केवला लज्जित --
मुग्धा अस्फुट जैं वदेल 'अपुली ना मी ?' मला वेढितां !

## श्रीशिवस्तुति

जाति - मेनका

शंकरा ! नमितों तव चरणा ॥ ध्रु. ॥
दयासागरा, गिरिजा-रमणा,
वृषभवाहना, भुजगभूषणा,
चंद्रशेखरा, भाललोचना, मकरध्वजदहना !

पिनाकपाणे, त्रिपुरनाशना,
नीलकंठ, कैलासनिवसना,
भस्मलेपना, भवभयहरणा, गजचर्मधारणा !

कर्पुरगौरा, सुरसिंधुधरा,
विश्वचालका, जगदुद्धारा,
पंचवदन, व्याघ्रांबरवसना, दक्षमखनाशना !

मायातीता, भक्तवत्सला,
अनाद्यनंता, शांत-निर्मला,
शब्दातीता, आनंदघना, अचला, अघहरणा !

## ‘मुक्तावली’ - विवाह

वृत्त - शार्दूलविक्रीडित

होत्या दोनहि कर्णशुक्ति उघड्या संपूर्ण माझ्या तदा;
वर्ण-स्वाति तुझ्या तयांत पडुनी गेल्या सुमुक्तापदा !
ते मुक्तामणि ओवुनीच सखया ! माला पहा गुंफिली,
अर्पाया तव कंठि बा करयुगीं मी आपुल्या घेतली.
तों ठेला हृदयीं समुद्भवुनियां चांडाल तूझ्या कलि !
माला तूं झिडकारिलीस अदया ! तूझी सुता ही भली !
कां ऐसें वदलास निंद्य वच, ‘ ही नाहींच माझी सुता !’ ?
वाणी वा अनृता नसे बुधमता लोकत्रया धुंडितां !
अव्हेरी निज कन्यका उपवरा ! लाजें पितृत्वा हिच्या !
होई संगत ही सुनीत-चरणां प्रेमें स्वयें रम्य या !
तत्संगें चिरकाल केलि करुनी राहील मोदें अतां !
गाऊनी निज रंजवील रसिका पाणिग्रहाची कथा !
तैं तूझी बकसभ्यता निरखुनी, भीती मनी वाटुनी,
ते जातील सुदूर मत्सम झणीं त्वत्संगती सोडुनी !

## गेलें वर्ष निघून एक !

वृत्त – शार्दूलविक्रीडित

गेलें वर्ष निघून एक ! दुसरें हें आज आलें नव !
दृष्टीतें वळवून आक्रमियल्या आयु:पथा पाहतों !
नाहीं एकहि गोड गीत रचुनी मीं गायिलें तूजला !
देखोनी हत निष्क्रिया हृदयीं या दाटे महा खिन्नता !
माझा दोष न, देवि ! हा; तुजवरी प्रीती अनन्या मम !
मायाचक्रच हें असें जडगती दोषार्ह गे सर्वथा !
येथें जीं हसतीं प्रभातसमयीं अंकीं लतेच्या फुलें,
मध्यान्हीं गळुनी धरेस पडतीं निस्तेज होऊनियां !
मूर्ती सोज्ज्वल सुप्रसन्न तव गे स्थापून हृन्मंदिरीं,
गातों संतत भावपूर्ण तुजला मी मूक गीतावली !
नेई अंतरिंची लयास जडता संसारचक्रोद्भव,
टाकीं पंजरबद्ध मुक्त करुनी रावा सदाचाच हा !
ताना घेउनि गोड गोड मग हा स्वच्छंद रानीं वनीं ––
हिंडोनी तुज गीत गात, जगता मोहील रम्य स्वनीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८१३६८ काव्य
२१३४ २०।२।०४

# तारका

जाति – साकी

चमक चमक तूं, सान तारके ! गगनांगणिं घननील,
कोण अससि तूं आश्चर्ये मम मानस होइ विलोल !
सर्व जगाच्या वरतीं वससी उंच किती गगनांत,
हिराच जणु कीं चमकत राही तेजें अपुल्या शांत !

तेजोनिधि रविराज जेधवां अस्तालागी जाई,
भिजवण जेव्हां हिमसेकानें हिरव्या कुरणीं होई,
मंद मंद तूं अपुलीं किरणें खेळविसी जगतांत,
चमक चमक तूं सर्व रात्रभर रम्य नील गगनांत !

नील नभींच्या बुरुजावरतीं जणू पहारा करिसी,
वेळोवेळीं पडद्याआडुनि माझ्या वांकुनि बघसी;
खिन्न नच तुझी दृष्टि कधींही ! सदैव तेजःपुंज --
उदयगिरीच्या सिंहासनिं जों ठाके भास्करराज !

तव तेजाची चमक चिमुकली विराजते तेजाळ,
पथिक जनांला तिमिरीं होई मार्गदर्शि बहुमोल.
तमें होउनी दृष्टि अंध त्यां पडेल मार्गीं भूल,
जरी न गगनीं रुचिर विराजे चमक तुझी स्नेहाळ.

पथिक म्हणोनी अन्तःकरणीं आनंदूनि अपार,
कृतज्ञतेनें तुझे मानिती वरचेवर आभार.
जरि मजलागी मुळींहि समजेना तूं अससी कोण,
चमक चमक गे अशीच गगनोदरीं, तारके सान !

# English Poems

# And

# Poetic Prose Passages

## TO THE RISING SUN

I HAIL thee, Rising Sun !
From behind the hill thou peepest,
And the sleepy Earth to rouse
Thy serene rays thou sendest.

O Spirit of Light and Life !
With thy warmth divine and fair,
This dull-eyed world reawake
And infuse her with noble care.

To ways more deadly than hell
She has taken and never knows;
Who else will win her anew,
Save thee, from suicide and woes ?

Enwrapt in thickening mists
In stupor deep she lies;
Thy luminous arms extend
To sweeep them and bid her rise.

O rouse her from her horrid dreams
Of greed and lust of power,
To glories of peace and love;
Thy benign looks upon her shower.

To universal love
And sympathy her soul recall,
And bless her diurnal dance
In heaven's immortal hall.

# CHIMAJEE THE BRAVE

SALT sea to the west, salt sea to the south,
Wild bogs to the east were seen;
Wild sands that yield to the foeman's heel
Lay north of Fort Bassein.

The Portuguese held the Fort, their refuge,
Against Chimajee's fire;
The Maratha, kindled with the fervour of faith,
Resolved to bombard with ire.

Day after day, week after week,
Two months had passed in vain;
The Marathas went on storming the Fort,
With no apparent gain.

Chimajee's soul within him burned
With the warfare's gloomy day;
He couldn't bear sight of his country's woes;
The enemy's hands who would stay ?

He called his soldiers foremost in arms,
And thus to them he spake
Despondent, desperate words of wrath
That did their heart awake :—

" Ye comrades ! cannon balls they fail
To raze the rampart strong;
From gun-mouth red my head discharge !
To rest in the Fort I long ! "

Chimajee's brave words quickened his ranks
To take action much more stern;
They succeeded in winning the Fort,
And a lasting name did earn.

# IN QUEST OF THE LOVER

" At morn serene in the mango-grove
Beside the river fair,
Beneath the big green tree, my Love,
Do come and see me there. "

In nightly dream her lover dead,
Thus to his beloved spake.
Quick she arose at dawn from her bed,
Blithe as a bird in the brake.

She did her hair with her utmost care
The Lover's eye to please,
And deck'd it with balmy blossoms fair
His lonesome heart to ease.

A sari of azure silk she wore,
And to her forehead fair
The saffron mark restored once more,
That like a star did stare.

Eager to meet her soul's delight,
In the silent morn she hied;
And soon arrived, when the day was bright,
In the grove by the river-side.

To search for her lover in vain she strove,
And wander'd the grove all over; —
A babbling brook of heavenly love,
Onward she stream'd ever more.

Burning with soul's utter despair,
Yet trusting hope to guide,
O'er hill and dale, through woods drear,
She wander'd far and wide.

A phantom sweeping did she seem!
And was she ever seen again?
The woods, the hills, the river-stream
Alone watch'd her toils vain!

## A LAMENT ON A SPARROW'S DEATH

A Sparrow in my courtyard dust,
On her leafy bed fell dead;
Ever agpe was her bill upthrust,
Her tiny legs outspread.

Still on her sides her wings did seize;
Yet lay around her strewn
Some of her feathers snatched by the breeze,
Sighing a sorrowful moan.

So young, so pretty, was she, indeed;
Death might have let her alone;
But Fate, too soon, did him to her lead,
And bid him make her his own.

None of her folk did wait to mourn
For her who was of their kind;
Unwept by her kith, and forlorn,
The grave her head must bind.

O Sparrow! why didst thou not stay
To taste a little more
Of the pleasures of this earthly play
In love's luminous bower?

Was thy life's pretty blooming rose
Blighted in its youthful prime
By thy soul's fervent love that was
Unreturned all the time ?

Or wert thou victim of thy kinsman's
Deadly revengeful spite,
Or of man's electric annoyance,
Or his shooting delight ?

Whatever the cause of thy death, poor bird,
Beyond our ken hast thou flown;
Thy flight to Heaven be unhindered !
Be there a place thine own !

## MY GRATEFUL SOUL

At dawn, on the eastern horizon grey,
A lonely, cold, dark cloud, I lay;
You kissed me with your serene ray,
And bid me wake on life's long way, ——
A diamond dazzling with glory gay.

In your path an unshapely stone, ——
Hard, uncouth, repulsive, I lay;
You wrought me with your fingers' play,
And gave me a sweet shape and tone,
And with your love filled me away.

A seedlet in a lonely vale, ——
Unseen, uncared, alone, I lay;
You showered me one summer day,
And bid me sprout happy and hale,
And raise myself above the clay.

Away in the poet's mind serene, ——
    A forlorn, lingering thought, I lay;
    He filled me with your love one day,
And vested me with a proud demein,
    And shaped me into a charming lay.

Unmindful of your love erewhile,
    I proudly clung to all I had got;
    And more and ever more madly sought
To reap harvests from the yielding soil,
    Unsatiate with my narrow lot.

But now in your infinite grace
    My age-long poverty doth abate !
    And I feel myself ever so great,
Even as a babe in a loving embrace
    Of its mother's arms, sitting in state.

What can I do to serve you best,
    O Lord ! — I feel an inward urge —
    But into your love wholly merge
Myself and seek eternal rest,
    Resigning lights from you emerge ?

## TO THE EVENING STAR

THOU darling of the crimson-coloured Even,
Bright Star ! in thy lone splendour hung aloft,
At Heaven's golden gateway smiling soft,
Thy pensile glory hath to me quite proven
That in the day's deceptive dazzle concealed,
Shines One Immortal Star, whose blessed beams
Fill every nook with their mellowest dreams,
And sings in man's serene soul self-revealed.
Beloved Star ! streaming at day's decline
Thy pearly banner of peace and love divine,
Prithee, teach mine impassioned soul the cunning,
Thou knowest well to rend its veil beguiling,
And seize the inmost Light o'erflowing free,
Where ne'er an earthly day its dawn doth see.

# TO THE OUTRAGEOUS INDIAN POLICEMAN OF 1942

POLICEMAN ! thou guardian of City's Peace !
On thee depends our happy hearth-and-home.
To thee with hope innocent children come,
And seek to lead them safely home to ease
Their anxious mothers. O let thee grow not
Inhuman for coins from thy master's chest
To stab them in cold blood at his behest.
Indulge thyself not in a beastly shot
Fired off at thy own kinsmen all unarmed,
To please his greedy wayward will alone.
Dost thou not know thy folk in agony groan
Beneath the foreign yoke that hath them harmed ?
If thou canst help them not, why scornest not
The stained silver to save thee from a blot ?

## O SWEET ONE !

O Sweet One ! fearest thou lest my locks black,
So charming now, like swarms of youthful bees,
Should tend to a silvery shade and slack
Love's foremost tie that binds to me thy eyes ?
Do not at dawn those smiling lips of Night
Kiss through her tresses of fine black and gold
The hoary Moon, on western heaven's calm height,
Bedeck'd with pearly stars of lustre bold ?
Nay, Dear ! thine eyes inside thy lids confine,
And enter thy heart's garden most divine;
There glowing in Love's fadeless bloom benign,
My locks of lovely black for ever shine,
On which Time dare not lay His harmful hands,
Which shall abide, though Death my life demands !

# TO THE OUTRAGEOUS INDIAN POLICEMAN OF 1942

POLICEMAN ! thou guardian of City's Peace !
On thee depends our happy hearth-and-home.
To thee with hope innocent children come,
And seek to lead them safely home to ease
Their anxious mothers. O let thee grow not
Inhuman for coins from thy master's chest
To stab them in cold blood at his behest.
Indulge thyself not in a beastly shot
Fired off at thy own kinsmen all unarmed,
To please his greedy wayward will alone.
Dost thou not know thy folk in agony groan
Beneath the foreign yoke that hath them harmed ?
If thou canst help them not, why scornest not
The stained silver to save thee from a blot ?

## O SWEET ONE !

O SWEET One ! fearest thou lest my locks black,
So charming now, like swarms of youthful bees,
Should tend to a silvery shade and slack
Love's foremost tie that binds to me thy eyes ?
Do not at dawn those smiling lips of Night
Kiss through her tresses of fine black and gold
The hoary Moon, on western heaven's calm height,
Bedeck'd with pearly stars of lustre bold ?
Nay, Dear ! thine eyes inside thy lids confine,
And enter thy heart's garden most divine;
There glowing in Love's fadeless bloom benign,
My locks of lovely black for ever shine,
On which Time dare not lay His harmful hands,
Which shall abide, though Death my life demands !

# A TRIBUTE TO BAPUJI

BAPUJI, Father of our Country's Freedom,
O noblest spirit, all honour to thee !
From age-long bondage hast thou set us free,
Wielding thy sacred weapon to benumb
The foe, and yet to give him might to come,
Oh, not with hateful rage to smite anew,
But in love and peace his lasting good to view,
And reach pinnacles of fame e'en in gloom.
But Ah ! the evil hour of that woeful eve !
The dastard's deadly shot thy blood did spill;
While gracious God thy pardoning soul invoked
To bless him ! Should our hearts for thee then grieve,
O martyr of ahimsa ? Didn't God will
Thy immortal soul with earthly bonds wasn't choked ?

# TO SPRING

THE sun's sanguine rays kiss the sullen Earth,
    And soothing strains of love breathe into her ear;
    She wakes up from her wintry wild dreams drear,
And to all things imparts her secret worth.
All Nature gets as if a bright new birth!
    In every garden, grove, and brake, and brere,
    Banners of new-born foliage appear
Unfurled to welcome Spring, the King of Mirth!
Inform man's mind with thy spirit, O King!
Thy sacred spell against his spoilt brain fling!
    His envy, hatred, lust, and pride transmute
Into an endless song of true delight:
    Let him forsake his ills and vain pursuit,
And join with all to reach exalted height.

# WE ARE THE BOYS BETTER EVERY DAY

"WE are the boys, yea, better every day!"
Whose slogan 's this that rends the sky on high?
We hasten to watch the children passing by,
Our eyes gleaming with satisfaction gay.
Ye children of the famous N. M. V.,
Bright hope of your dear parents and nation,
Be true to what you say with such passion,
And let your School in your worth worthy be!

Let sterling Virtues in your heart take root
To blossom fair and smile in richness of fruit,
In vital sunshine of Goodness and Truth!
Yet Love of Freedom and Valour, in truth,
Ye need most. With your utmost care them nurse
To win your Land from Slavery's vile curse!

## THE BEGGAR CHILD

He was a little beggar child clothed in tatters that could hardly conceal his person.

For ages he had been busy going his wayward round over life's crowded paths, unheedful of his mother's love streaming from behind.

Indeed, he had missed her benign presence in his indulgent desire for hoarding up unhealthy leavings of the world.

From house to house he ran clamouring for alms, and filled his wallet ceaselessly with countless things picked from all quarters, that defied description.

And somehow his hasty step slipped, and he stumbled headlong on his way. Plucking up courage, however, he stood up, and chanced to look behind. And Ah! his baffled heart broke, for instantly it flashed through his being that he had long missed his mother's vital presence.

In utter bereavement he sent up one grievous cry that sprang from the inmost depth of his heart, and rent the whole atmosphere, "Mother! O dear Mother! Where art thou?"

His anguish was too great for him. In disregard he flung off his wallet, heavy with alien things, and restlessly ran around to regain his own.

And lo! from within a covert came a ffood of clarion assurance that hailed him, "Ease thine heart, my darling! Ease thine heart! Here am I."

The filial strain at once he realised, and soon stood embracing each other in eternal union mother and child---the lovely morn incessantly pouring her fadeless glory on the tender blooming glance of innocent childhood.

## LIGHT! O LIGHT!

Light! O Light! I cry for Light!

My Lamp has gone out. Who will light it anew? I long for a lamp to illumine my path with its lambent light on my journey through this dark dreary night.

I do not know when my Lamp went out, nor how; nor do I know if it is really quite extinct. I know only I have borne it lightless for countless ages.

To me they bring their bright burning torches, hoping to enlighten my way. But their flares simply deepen the darkness before my eyes and hopelessly confound me.

I shade the lingering flicker of my Lamp with my cloak, lest it should be blown out by fitful gusts. But Ah! the more it chokes up, the more I enclose it within my folds.

"Do away, you fool," rebukes at last from within, a kindly admonition, "do away with your vile folds! Leave the Flame at large! Smother it not!"

I start and let go of my cloak. Off it falls from me. And Oh! instantly there shines afresh my Lamp in its immortal freedom, whose charming divine radiance fills all earth and heaven to the brim.

## O LONELY ONE!

When the day of busy activity is over, and the night wraps up the world in its silent darkness, thou comest clamouring for alms and fillest the calm air with thy piteous cry, like a gust of wind rushing through leafy trees.

The door of my house is shut, yet thy universal call hath its unfailing appeal to me. It pierces my sleepy heart and makes it impatient with eagerness to receive thee at my house.

And lo! from within a covert came a ffood of clarion assurance that hailed him, "Ease thine heart, my darling! Ease thine heart! Here am I."

The filial strain at once he realised, and soon stood embracing each other in eternal union mother and child---the lovely morn incessantly pouring her fadeless glory on the tender blooming glance of innocent childhood.

⚜ ⚜ ⚜

## LIGHT! O LIGHT!

Light! O Light! I cry for Light!

My Lamp has gone out. Who will light it anew? I long for a lamp to illumine my path with its lambent light on my journey through this dark dreary night.

I do not know when my Lamp went out, nor how; nor do I know if it is really quite extinct. I know only I have borne it lightless for countless ages.

To me they bring their bright burning torches, hoping to enlighten my way. But their flares simply deepen the darkness before my eyes and hopelessly confound me.

I shade the lingering flicker of my Lamp with my cloak, lest it should be blown out by fitful gusts. But Ah! the more it chokes up, the more I enclose it within my folds.

"Do away, you fool," rebukes at last from within, a kindly admonition, "do away with your vile folds! Leave the Flame at large! Smother it not!"

I start and let go of my cloak. Off it falls from me. And Oh! instantly there shines afresh my Lamp in its immortal freedom, whose charming divine radiance fills all earth and heaven to the brim.

## O LONELY ONE!

When the day of busy activity is over, and the night wraps up the world in its silent darkness, thou comest clamouring for alms and fillest the calm air with thy piteous cry, like a gust of wind rushing through leafy trees.

The door of my house is shut, yet thy universal call hath its unfailing appeal to me. It pierces my sleepy heart and makes it impatient with eagerness to receive thee at my house.

In a moment is my door flung open for thee. Wait, O Welcome Guest, wait at my door! Accept my gift soaked in the brimful love of my heart and make it into thine own.

And now, O Lonely One, I crave for thy blessing! Bless me with the immortal music ceaselessly flowing from thy bountiful heart. Let the soothing melodies of thy ever-blooming song awaken me into the land of eternal peace.

## RID ME OF THESE

Take back these ornaments of thine, my Beloved! Take these back!

I have worn these decorations for countless ages, and I had, indeed, forgotten long since that these had come as thy gifts sent to me out of the fulness of thy infinite love.

With stricken heart I now regret that my vision had been blinded--that I had utterly failed to see the gem of thy love bristling with serene rays, hidden inside.

And O this divine splendour of thy eternal love, now gushing forth in a flood of light from the inmost depth of my being!

Rid me, O Lord of my life, rid me now of these golden rings and wristlets, and these jewelled chains. Take back this finery, O take it away.

It is too cunningly wrought. This witchery of workmanship lavished on it is too absorbing, indeed, to let me drink my fill at this fountain of thy love. It holds me back in its meshes at every step.

## THE CAPTIVE

The day of busy activity had dawned. I felt disgraced to sit by you, idly listening to your lovesome whispers. Regardless of your blossoming looks, I tore myself away from you, and hastened to my day's work.

At midday you came to offer me a bowl of milk and a bunch of fresh flowers. You stood gazing quietly at me. Your eager eyes were desirous of my company for a while. But in the heat of my busy toil I quite ignored you, and spurned your offer.

When the golden harp of sunset announced the parting day, I returned from my work. You were eagerly awaiting my arrival. You welcomed me with a shower of lovely glances and sweet music, rippling on your rosy lips. My mind was still obsessed with the thought of the work left unfinished. Your loving presence could hardly arrest my attention.

And now it is the dead hour of midnight. Darkness envelops the world, and silence is supreme everywhere. At this calm hour you come singing songs of love, like a cuckoo-bird pouring his impassioned notes in the silent darkness.

Indeed, your presence overpoweringly asserts itself now, and claims my attention. Your love is too great in its simplicity to pass by unheeded. Helplessly I am caught at last in the snare of your sweet glances, never to be able any more to break through this captivity of endless joy.

## O CAPTAIN OF MY SHIP

I do not know when I undertook my voyage, yet methinks from time immemorial I have been sailing in my vessel over this vast shoreless ocean.

Proud of my seamanship I have steered my vessel through calms, and through fearful storms, hoping to anchor some day in the harbour of the land of bliss.

But alas for me ! the more I sail on, the farther away, indeed, do I seem to stray from my destination ! I doubt whether this voyage of mine ever will have its end or not.

My skill of seamanship has been baffled—I am utterly bewildered and helpless.

Sit at the helm, O Helmsman, sit at the helm now. I had quite forgotten thou art the mafter of my vessel.

O Captain of my ship, thy benign presence dawns on me now like the smiling rosy morn. I hear the sweet music of thy immortal voice, calling upon me to leave all care of my voyage to thy eternal will, and rest in peace.

REFBK-0018852
REFBK-0018852

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६ | १२ | रंमणारें | रंगणारें |
| ३५ | ४ | आवितास | लावितास |
| ५१ | ११ | घरा | धरा |
| ६२ | ११ | नाउनियां | जाउनियां |
| ६२ | १४ | प्रकृतिमत | प्रकृतिगत |
| ६६ | ८ | तुझ | तुझें |
| ६६ | १४ | देवानें | दैवानें |
| ७० | १६ | चंद्रकांत | चंद्रकला |
| ७१ | १ | जेशा | जैशा |
| १०४ | ५ | अर्पील; | अर्पील |
| १०४ | ५ | आनंदुनी | आनंदुनी; |
| ११७ | ११ | --nner | banner |